रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २७
www.ramprahar.com
# राम प्रहर
बुधवार १३ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
गणेशोत्सवासाठी पोलीस, प्रशासनाची तयारी पूर्ण/२
कलोते धरणात बुडून तरुणाचा मृत्यू/५
आयसीसी पुरस्कारावर गिलची चौथ्यांदा मोहोर/८

## भाजपची उत्तर रायगड जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**पनवेल** : भाजपच्या संघटनात्मक निवडणुका सुरू असून प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे आणि पक्षाच्या नियमानुसार उत्तर रायगड जिल्हा पदाधिकाऱ्यांची नवीन कार्यकारिणी जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी जाहीर केली. या कार्यकारिणीत चार सरचिटणीस (महामंत्री), आठ उपाध्यक्ष, आठ चिटणीस, एक कोषाध्यक्ष व इतर कार्यकारी सदस्य अशा एकूण ९० जणांचा समावेश आहे. यामध्ये ३३ टक्के महिला पदाधिकारी, एससी, एसटी पदाधिकाऱ्यांना पक्षाच्या घटनेप्रमाणे पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. उत्तर रायगड जिल्ह्यात भाजपची १७ मंडळे तीन विधानसभा आणि चार तालुक्यांमध्ये विभाजित झाली आहेत. सर्व मंडळे, विधानसभा व समाज घटकांना पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. यानंतर लवकरच विविध आघाड्या, सेल, व प्रदेश सदस्य जाहीर करण्यात येणार आहेत. **(पान २ वर..)**

# महाराष्ट्र पोलीस दलात मेगा भरती

## शिपायांची तब्बल १५ हजार पदे भरणार; मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र पोलीस दलातील शिपायांची सुमारे १५ हजार पदे भरण्यात येणार आहेत. त्याकरिता सन २०२४-२५च्या पोलीस शिपाई भरती प्रक्रियेस मंगळवारी (दि. १२) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या भरतीत सन २०२२ व सन २०२३मध्ये संबंधित पदाची विहित वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांनाही एक वेळची विशेष बाब म्हणून अर्ज करता येणार असून भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे.

राज्याच्या पोलीस दलात सन २०२४ दरम्यान रिक्त असलेली व २०२५मध्ये



रिक्त होणाऱ्या पदांचा आढावा घेऊन ही भरती करण्यात येणार आहे. भरण्यात येणारी पदे पोलीस शिपाई १० हजार ९०८, पोलीस शिपाई चालक २३४, बॅण्डस् मॅन २५, सशस्त्र पोलीस शिपाई दोन हजार ३९३, कारागृह शिपाई ५५४ अशी आहेत.

पोलीस शिपाई व कारागृह शिपाई ही पदे गट-क संवर्गातील आहेत. पोलीस शिपाई भरती प्रक्रिया त्या-त्या जिल्हास्तरावरून राबविण्यात येते. त्यासाठी ओएमआर आधारित लेखी परीक्षा घेण्यात येईल.

भरतीसाठी अर्ज मागवणे, अर्जाची छाननी, त्यावर प्रक्रिया तसेच उमेदवारांची शारिरीक परीक्षा, त्यातून पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा यासाठी अनुषांगिक प्रक्रिया राबविण्याचे अधिकार प्रशिक्षण व खास पथके विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालकांना देण्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दलातील शिपाई संवर्गाची पदे अत्यंत महत्त्वाची आहेत. पदे रिक्त राहिल्यास पोलिसांवरील कामाचा ताण वाढतो. पोलीस दल व कारागृहातील स्थिती सुधारण्यासाठी उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयानेही वेळोवेळी ही पदे वेळेत भरली जावीत, असे निर्देश दिले आहेत.



## आमदार महेश बालदी यांच्या पुढाकाराने आदिवासी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास सुखकर

### भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री अशोक उईके यांच्या हस्ते मोफत बससेवेचे लोकार्पण

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून चौक विभागातील आदिवासी शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत बससेवा सुरू करण्यात आली असून या सेवेचा शुभारंभ विधान भवन येथे भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते मंगळवारी (दि. १२) करण्यात आला. या सेवेमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रवास सुखकर झाला आहे.

या लोकार्पण सोहळ्याला आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, माजी जि.प. सदस्य मोतीराम ठोंबरे, खालापूर अध्यक्ष प्रवीण मोरे, पनवेल पश्चिम अध्यक्ष रूपेश धुमाळ, गणेश कदम व शिक्षक उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## विविध विकास प्रकल्पांमध्ये युवा पिढीला संधी मिळणार

■ आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या परिसरात विविध विकासाचे प्रकल्प येणाऱ्या काळात सुरू होणार आहेत. त्याद्वारे युवा पिढीला त्यांचे कर्तृत्व गाजवण्याची संधी मिळेल, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी पेण तालुका रहिवासी संघाच्या गुणगौरव सोहळ्यात केले.

पेण तालुका रहिवासी संघाचे सभासद आणि पाल्यांच्या गुणांना वाव देण्यासाठी खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर आणि अतुल म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. **(पान २ वर..)**

पाणीपुरवठ्यासंदर्भात गव्हाण ग्रामस्थांचा सिडको प्रशासनाविरुध्द

जन आक्रोश मोर्चा

गव्हाण गावातील सर्व नागरिकांना या पत्राद्वारे कळविण्यात येते की, गव्हाण गाव हे अनेक समस्यांनी ग्रासलेले आहे. नवी मुंबईचा विकास होत असताना उलवे नोडचा विकास होत आहे, पण गव्हाण गाव पनवेल तालुक्यात सर्वात मोठे गाव असतानाही या गावात अनेक समस्या आहेत. त्या एकत्र येवून सोडविण्याची आज गरज आहे. त्यातीलच आजच्या घडीला पाणी प्रश्न ही अतिशय महत्वाची समस्या झाली आहे. याच समस्येचे निराकरण करण्यासाठी सर्व गव्हाण ग्रामस्थांच्या एकजुटीने सिडको प्रशासनावर भव्य मोर्चा काढण्याचा ठराव केला आहे. तरी आपल्या गावातील प्रत्येक व्यक्तीने मोर्चात सहभागी होणे गरजेचे आहे.

गुरुवार दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता

ठिकाण
सेक्टर - १९, सिडको ऑफीस, उलवे नोड.

आपले नम्र
तीन समाज अध्यक्ष व ग्रामस्थ मंडळ गव्हाण

मोर्चासाठी प्रत्येक घरातील व्यक्तीने हजर असणे गरजेचे आहे.
टिप : जाण्या-येण्याकरीता वाहनाची व्यवस्था केली आहे.




सवलतींचे 03 दिवस बाकी !
अभय योजने अंतर्गत मालमत्ता कर एक रकमी भरल्यास शास्तीवर १०% सूट.
ही सवलत फक्त १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत लागू आहे.

चालू वर्ष २०२५-२६ करिता ३१ ऑगस्ट पर्यंत कराचा संपूर्ण भरणा करा आणि ५% सूट हमखास मिळवा.

E-Bill स्वीकारा, डिजिटल भरणा करा वेळ वाचवा, २% सूट घेऊन बचत वाढवा!

ऊर्जा बचत करा सौर शक्तीने, आणि करामध्ये घ्या २% सूट!

जल पुनर्भरणाचा अवलंब करा, २% सूट सहज मिळवा!

घनकचरा शास्त्रोक्त पद्धतीने हाताळा, सवलतीचं दार उघडा आणि करात २% सूट मिळवा!

कचऱ्याची शिस्तबद्ध विल्हेवाट करा, मिळवा २% करामध्ये सवलत हमखास!

डिजिटल युगात स्मार्ट निर्णय! पारंपरिक रांगा सोडा, PMC Tax App & Panvel Connect App वरून घरबसल्या कर भरा!

वेळ वाचवा, panvelmc.org वरून कर ऑनलाईन भरा आणि मालमत्ता करामध्ये सवलती मिळावा.

मंगेश चितळे
आयुक्त तथा प्रशासक,
पनवेल महानगरपालिका

# गणेशोत्सवासाठी रायगड पोलीस आणि प्रशासनाची तयारी पूर्ण

## जिल्ह्यात १ लाख २ हजार १९८ खासगी; तर २८६ सार्वजनिक मंडळाचे गणपती

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात २७ ऑगस्ट २०२५ पासून गणेशोत्सव हा सण मोठया प्रमाणात उत्साहाने साजरा होणार आहे. जिल्ह्यात १ लाख २ हजार १९८, तर २८६ खासगी सार्वजनिक मंडळाचे गणपती असणार असून पोलीस व जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार उत्सवासाठी गावी परतणाऱ्या कोकण वासियांच्या सुविधांसाठी यंत्रणा सतर्क असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.



गणेशोत्सव २०२५ शांततेत पार पाडण्याच्यादृष्टीने कायदा व सुव्यवस्था आबाधित राखण्यासाठी जिल्हा नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय रायगड येथे जिल्हास्तरीय शांतता कमिटी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील आदि उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, महसूल, पोलीस, नगरपालिका, ग्रामपंचायत यासह विविध शासकीय विभागांनी गणेशोत्सव आनंदात व सुव्यवस्थित होण्यासाठी उपाययोजना व नियोजन पूर्ण केले आहे. जिल्ह्यात गणेश उत्सवाचे पूर्वतयारी जोरात सुरू असताना प्रशासन देखील गणेशोत्सवाच्या काळात कायदा सुव्यवस्था सुव्यवस्थित राखणे, गणेश भक्तांना योग्य ती सुविधा प्राप्त करणे, कोकणामध्ये खास गणवेशोत्सवासाठी परतणाऱ्या चाकरमान्यांसाठी प्रवास सुखकर होईल या दृष्टीने उपाययोजना करणे या दृष्टीने सतर्क झाले आहे. गणेश भक्तांचा प्रवासात कोठेही अडचण न येता प्रवास सुखकर होण्याच्या दृष्टिकोनातून पेट्रोलिंग, फिक्स पॉईन्ट, सुविधा केंन्द्र, क्रेन, ॲम्ब्युलन्स व होमगार्ड नेमण्यात आले आहेत. मुंबई-गोवा महामार्गावर सुविधा केंद्रावर पोलीस मदत केंन्द्र, आपत्कालीन पोलीस मदत टोईंग व्हॅन, क्रेन, वाहन दुरुस्ती कक्ष, आपत्कालीन वाहन दुरुस्ती व टायरमध्ये हवा भरण्याची सुविधा असेल. वैद्यकीय कक्ष, ॲम्ब्युलन्स सेवा, मोफत आपत्कालीन वैद्यकिय उपचार सुविधा, बालक आहार कक्ष व मोफत चहा, बिस्कीट, सरबत, पाणी, ओ.आर.एस. आणि महिलांसाठी फिडींग कक्ष उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर अवजड वाहनांना बंदीच्या दृष्टीने दिनांक निहाय आदेश देण्यात आले आहेत. १६ टन व त्यापेक्षा अधिक वजन आहे अशा वाहनांना हे बंदी आदेश लागू राहतील. यानुसार २३ ऑगस्ट २०२५ सायंकाळी १८.०० वाजेपासून ते २९ ऑगस्ट २०२५ रात्री बारा वाजेपर्यंत तसेच २ सप्टेंबर २०२५ सकाळी ८ वाजेपासून ते ०४ सप्टेंबर २०२५ रात्री ८ वाजेपर्यंत तसेच ०६ सप्टेंबर २०२५ सकाळी ८ वाजेपासून ते ०८ सप्टेंबर २०२५ रात्री ८.०० वाजेपर्यंत आदेश अंमलात राहणार आहेत. या गणेशोत्सवाची सांगता दीड दिवस, पाच दिवस,सात दिवस अशा विविध दिवशी तसेच दहा दिवसाचे ०६ सप्टेंबर २०२५ रोजी आणि २१ दिवसाचे गणपती २७ सप्टेंबर २०२५ रोजी यानुसार विसर्जनाचे दिवशी होईल. यासाठी सार्वजनिक गणेश मुर्ती विसर्जन ठिकाणे निश्चित करण्यात आले आहेत. यातील समुद्रावर ५२ गणेशमुर्ती विसर्जन, खाडीमध्ये १०५ गणेशमुर्ती विसर्जन, नदीमध्ये २४४ गणेशमुर्ती विसर्जन, तलावामध्ये १०० गणेशमुर्ती विसर्जन व इतर ठिकाणी ९४ गणेशमुर्ती विसर्जन होणार आहे . या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्था व शासनाकडून सुविधा नियोजन व उपायोजना करण्यात येत आहे.

मुस्लीम बांधवाचा ईद-ए-मिलाद हा सण दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा होत आहे. जिल्हयात नमाज पठणाचा कार्यक्रम होणार असून विसर्जनाच्या मिरवणुका काढण्यात येणार आहेत. त्याकरीता पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्वतंत्र बंदोबस्त लावण्यात येणार आहे.

गणपती उत्सवादरम्यान जिल्हयात पोलिस,होमगार्ड, एसआरपीएफ, अधिकारी कर्मचारी बंदोबस्त लावण्यात येणार आहे. या कालावधीत दहशतवादी कारवाई रोखण्यासाठी एटीबी व एटीसी चे पथक नेमण्यात आले असून सोशल मिडीया देखरेख करण्याकरीता सायबर सेल सतर्क आहे. प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

# महाराष्ट्र आणि सिंगापूर यांच्यातील सागरी सहकार्याला नवा आयाम -मुख्यमंत्री फडणवीस

**रायगड : रामप्रहर वृत्त**




भारत आणि सिंगापूर यांच्यातील सागरी व्यापार, पायाभूत सुविधा, डिजिटायझेशन, डेटा सेंटर्स आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील वाढते सहकार्य आणि अनेक सामंजस्य करारांमुळे आर्थिक बंध अधिक दृढ होत असून यामुळे विशेषतः महाराष्ट्र आणि सिंगापूरमधील संबंधांना नवीन आयाम मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला तसेच वाढवण बंदर विकासासाठी सहकार्य करावे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाच्या जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी आणि इंडियन पोर्ट्स असोसिएशन यांच्या वतीने जेएनपीए बिझनेस सेंटर, उरण येथे ग्रीन अँड डिजिटल मेरिटाईम कॉरिडॉर्स लिडर्स डायलॉग आयोजित करण्यात आला होता, यावेळी ते बोलत होते. मंचावर सिंगापूरचे उपपंतप्रधान गान किम येंग, सिंगापूर परिवहनमंत्री जेफरी सियो, जेएनपीए चेअरमन उन्मेष वाघ, बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे सचिव टी. के. रामचंद्रन उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी (जेएनपीए) येथील नवीन पीएसए टर्मिनलचे लवकरच उद्घाटन होणार असून ही अत्याधुनिक सुविधा जेएनपीएच्या ५०% कंटेनर क्षमतेचे नियोजन करेल तसेच भारताच्या जागतिक व्यापाराला चालना देईल. या सुविधेमुळे भारताची सागरी शक्ती अधिक सक्षम होईल, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

# रयतेचा विद्यार्थी असल्यामुळे कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याबद्दल आस्था -आमदार दरेकर

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पैठण येथील हायस्कूलमध्ये रयत शिक्षण संस्थेचा विद्यार्थी असल्यामुळे कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याबद्दल विशेष आस्था असल्याने गरिबांची मुलं शिकण्यासाठी विशेष प्राधान्याने सहकार्य करण्याची ग्वाही विधानपरिषदेचे सदस्य आमदार प्रवीण दरेकर यांनी दिली.

रयत शिक्षण संस्थेच्या विद्यामंदिर पोलादपूर प्रशालेतील इंग्रजी माध्यमाच्या सहावी ते दहावीच्या वर्गांना शिक्षण मंत्रालयाकडून मान्यता आणण्याकामी महत्वपूर्ण सहकार्य केल्याबद्दल रयतच्या गव्हर्निंग बॉडीचे सदस्य व स्थानिक शाळा सभापती निवास शेठ यांच्याहस्ते आमदार प्रवीण दरेकर यांना धन्यवाद देत सत्कार करण्यात आला.

या वेळी आमदार दरेकर यांनी तालुका क्रीडा संकुलासह रयत शाळेपर्यंत मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग ओलांडून येण्यासाठी स्काय वॉकसाठीही पाठपुरावा करण्याचीभूमिकास्पष्ट करून नजिकच्या काळात पोलादपूरसाठी भरीव कार्य करून दाखविण्याची इच्छा व्यक्त केली. याप्रसंगी भाजपचे प्रसन्ना पालांडे, दिलीप भागवत उपस्थित होते.

# सर्वांगीण विकासासाठी मालमत्ता कराचा भरणा करा; पनवेल महापालिकेचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या सर्वांगीण विकासासाठी मालमत्ता कराचा त्वरित भरणा करून पनवेल महानगरपालिकेस सहकार्य करावे असे अवाहन महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे

भारताचे संविधान भाग नऊ क नगरपालिका अनुछेद २४३ भ अन्वये मालमत्ता कर आकारणी करणे, वसूल व विनियोजन करणेकामी तरतूद केलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२७, १२८, १२९, १५०अ अंतर्गत मालमत्ता कराची आकारणी करणेत येत आहे. महानगरपालिका क्षेत्रातील जमिनी व इमारतींना मालमत्ता कर हा ऐच्छिक नसून, अनिवार्य आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२८अ (१) अन्वये पाणी लाभकर, मलनिस्सारण कर, सर्व साधारण कर, शिक्षण उपकर, पथकर व सुधार आकार याचा समावेश होत आहे. सदर कर मालमत्ता धारकांस भरणा करणे अनिवार्य आहे.



महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५० अ तसेच अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम १५ (२) अन्वये पनवेल महानगरपालिकेमार्फत पूर्वलक्षी प्रभावाने मागील ६ वर्षे पर्यंत मालमत्ता कर आकारणी करणेत आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९९ व १२८अ अन्वये स्थायी समिती सभेत मालमत्ता कर व दरास मंजूरी देण्यात आली. सदर मंजूरी सर्वसाधारण सभा दिनांक १७/०१/२०१९ अन्वये मालमत्ता कर व करांचे दरास दिनांक ०१/१०/२०१६ पासून मान्यता देण्यात आलेली आहे.

सिडकोने सिडको वसाहतीसाठी सेवा दिलेल्या असल्याने सेवा शुल्क वसूल करत आहे. सदर सेवा शुल्क सिडको जमिनीवर सरसकट आकारणी करत आहे. मालमत्ता कर हा जमिनीवर उभ्या असलेल्या इमारतीवर (सदनिका, कार्यालय, दुकान व इमल्यावर) क्षेत्रफळ व बांधकाम प्रकारानुसार आकारत आहे. त्यामुळे सिडको सेवा शुल्क व महानगरपालिकेचा मालमत्ता कर हा स्वतंत्र असून त्याचे नियम व लागू करणेची प्रणाली वेगवेगळी आहे. मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली व मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे मालमत्ता करच्या संदर्भात विविध याचिका दाखल असून, त्यांची सुनावणी प्रक्रिया सुरु आहे.

पनवेल महानगरपालिकेने आकारणी केलेले दाराची टक्केवारी ही लगतच्या महानगरपालिकांच्या मालमत्ता कारच्या दराच्या टक्केवारी पेक्षा कमी आहे. पुर्वाश्रमिच्या ग्रामपंचायतीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२९ अ अन्वये तत्कालीन ग्रामपंचायत मध्ये कर आकारणी झालेली असल्यास अशा मालमत्तेस २०%, ४०%, ६०%, ८०% प्रमाणे सामान्य कर आकारून त्याच्या पुढील वर्षी महानगरपालिकेच्या समतुल्य कर आकारणी करण्यात आली आहे.

पूर्वाश्रमीच्या ग्रामपंचायत क्षेत्रातील मालमत्तांचे झोन पुनर्निश्चित करण्यात आले. याअंतर्गत, निवासी गावठाण क्षेत्रातील मालमत्तांना झोनमध्ये योग्य त्या स्वरूपात समाविष्ट करून कर दरांमध्ये मोठ्या प्रमाणात घट करण्यात आली. त

याचप्रमाणे पनवेल महानगरपालिकेने १८/०७/२०२५ पासून शास्ती माफी च्या अनुषंगाने अभय योजना लागू केलेली असून दिनांक १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत आंपूर्ण मालमत्ता कराच एकरकमी कर भरणा केल्यास शास्तीच्या रकमेत ९० टक्के इतकी सवलत मिळत आहे.

# दिघा परिसरातील मध्यरात्रीच्या गस्तीत केमिकल टँकर जप्त

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या दिघा विभागामध्ये ०७ ऑगस्टपासून ग्रीन वर्ल्ड सोसायटी आणि रामनगर परिसरात केमिकलचा उग्र वास येत असल्याने परिसरातील नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. ११ ऑगस्ट रोजी रात्री साधारणतः १.०० वाजता. दिघा स्टेशन समोर मुकंद कंपनी गेटजवळ उभ्या असलेल्या संशयित टँकरच्या तपासणीमध्ये त्या टँकरमध्ये उग्र दुर्गंधीचे रसायन असल्याचे आढळून आले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यांनी लिटमस पेपरद्वारे ते रसायन तपासले असता सदर रसायन हानीकारक असल्याचे आढळून आले. याबाबत गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

# जीवन शिक्षणावर आधारित शिक्षक कार्यशाळा

**मुंबई : प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांना जीवन शिक्षणाचे धडे देणारी देशातील अग्रगण्य सामाजिक संस्था संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानच्या वतीने प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील शिक्षकांसाठी एका अनोख्या कार्यशाळेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.

या वेळी प्रतिष्ठानचे संस्थापक विश्वस्त आणि शिक्षणतज्ज्ञ मोहन सालेकर यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रतिष्ठानच्या प्रांत संयोजिका नम्रता पुंडे विभाग संयोजिका सुचित्रा परब आदी मान्यवर उपस्थित होते. सोलकर म्हणाले, आज अल्पवयीन मुलांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती अमली पदार्थांचे सेवन वडीलधाऱ्यांबद्दल अनादर मनाची चंचलता उग्रता आणि सहनशीलतेचा अभाव दिसत आहे.

आज अल्पवयीन मुलांमध्ये आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे,त्याची गंभीर दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने शासनाला आणि शाळांना याबाबत पावले उचलण्याच्या संदर्भात स्पष्ट निर्देश दिले आहेत. संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानच्या कार्याची माहिती देताना संयोजिका नम्रता पुंडे म्हणाल्या की,गेल्या २२ वर्षांपासून प्रतिष्ठान शालेय विद्यार्थ्यांना भारतीय जीवन मूल्यांचे शिक्षण देत आहे.

प्रतिष्ठानचा जीवन शिक्षण प्रकल्प देशातील २३ राज्यांमध्ये कार्यरत आहे.यावर्षी महाराष्ट्रातील १४०० शाळांमधील एक लाख ५० हजार विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले आहेत आणि अलीकडेच गोवा सरकारने त्यांच्या सर्व शाळांमध्ये हा उपक्रम सुरू करण्यास मान्यता दिली आहे. अशाच प्रकारच्या कार्यशाळा चेंबूर, ठाणे, घाटकोपर, नवी मुंबई, डोंबिवली, कर्जत, रत्नागिरी गोमंतक आदी ठिकाणी होत आहेत. कार्यक्रमाचे संचालन मानसी शिंदे यांनी केले, तर आभार जयश्री चुरी यांनी मानले.

# रायगडात हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता अभियान अंतर्गत विविध उपक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्रीय जल शक्ती मंत्रालय आणि सांस्कृतिक कार्य मंत्रालय यांच्या संयुक्त सहकार्याने हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता मोहीम राबविण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, शाळा-महाविद्यालयात १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या मोहिमेत जिल्हा, तालुका, ग्रामपंचायत, गावा-गावांमधील लोकांचा सक्रिय आणि उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, महिला बचत गट, सरपंच सदस्य तसेच शालेय विद्यार्थी, स्वयंसेवक यांनी मोहिमेत सहभाग घ्यावा व ग्रामस्थांनी स्वच्छतेशी निगडीत विविध उपक्रम राबवून अभियान यशस्वी करावे, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी केले आहे.

### ■ असे आहे नियोजन

**१३ ऑगस्ट** : जिल्ह्यात स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. या वेळी सार्वजनिक ठिकाणांसह रस्ते, पाण्याच्या टाक्या, पाणी स्रोत परिसर स्वच्छता, सार्वजनिक शौचालयांचा परिसर स्वच्छता करण्यात येणार आहे. स्वच्छता मोहीमतंर्गत गावात स्वच्छता रॅली काढण्यात येणार आहे.

**१४ ऑगस्ट** : गावातील सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, चौक, बाजारपेठ, प्रमुख ठिकाणे यांची अंतिम स्वच्छता व सजावट आणि ध्वजारोहणासाठी ठिकाण निश्चित करणे. साफसफाई करण्यात येणार आहे.

**१५ ऑगस्ट** : ग्रामपंचायत कार्यालय व इतर सरकारी इमारती, अमृत सरोवर इत्यादी ठिकाणी ध्वजारोहण करण्यात येणार आहे.

पान १ वरुन

## भाजपची उत्तर रायगड जिल्हा कार्यकारिणी जाहीर

या कार्यकारिणीत सरचिटणीस म्हणून दीपक बेहेरे, माजी नगरसेवक नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे, तर उपाध्यक्ष म्हणून सुधीर ठोंबरे, अश्विनी पाटील, माजी नगराध्यक्ष सुनील घरत, प्रल्हाद केणी, चंद्रकांत घरत, गणेश कडू, मयुरेश नेतकर व समीर कदम यांना संधी देण्यात आली आहे. चिटणीस म्हणून नितीन कांदळगावकर, माजी जिल्हा परिषद सदस्य नरेश पाटील, रविनाथ पाटील, शरद ठाकूर, विद्या तामखडे, विनिता घुमरे, सायली म्हात्रे, शामला सुरेश यांना जबाबदारी देण्यात आली असून कोषाध्यक्षपदी अभिलाषा ठाकूर यांना कायम ठेवण्यात आले आहे. यासह नगरसेवक व लोकप्रतिनिधींना कार्यकारिणी सदस्य म्हणून स्थान देण्यात आले आहे.

नवनियुक्त पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार सुरेश लाड, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, रविशेठ भोईर, महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## आमदार महेश बालदी यांच्या पुढाकाराने आदिवासी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास सुखकर

उरण विधानसभेचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांनी आपल्या मतदारसंघातील आदिवासी समाजाच्या विकासासाठी लक्ष केंद्रित केले आहे. त्या अनुषंगाने त्यांच्यासाठी फिरता दवाखाना, घरकुल, सामाजिक सभागृह तसेच विविध पायाभूत





सुविधा देण्याचे काम ते करत असून त्यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आणि आदिवासी समाजाच्या विकासासाठी आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. ही बससेवा कलोते मोकाशी ठाकूरवाडी, कलोते खोंडा ठाकूरवाडी, कलोते रयती ठाकूरवाडी या मार्गावर धावणार आहे. या उपक्रमामुळे संबंधित भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी होणारी लांबची पायपीट थांबणार असून त्यांना सुरक्षित, सोयीस्कर व वेळेवर शाळेत पोहचण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. या सेवेमुळे केवळ शिक्षणाचा मार्ग सुलभ झाला नाही, तर आदिवासी समाजातील पालकांनाही आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत अधिक विश्वास आणि प्रोत्साहन मिळाला आहे. या उपक्रमासाठी जे.एम. बक्षी यांचे सहकार्य लाभले आहे.

आदिवासी समाज दुर्गम भागात राहतो. त्याला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम अशा उपक्रमातून होत आहे. त्यामुळे आमदार महेश बालदी यांनी राबविलेला उपक्रम अत्यंत स्तुत्य आणि प्रेरणादायी आहे, अशी प्रतिक्रिया प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिली; तर सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम आमदार महेश बालदी यांनी केल्याचे गौरवोद्गार आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांनी काढले. त्याचप्रमाणे या महत्त्वपूर्ण अशा सामाजिक उपक्रमाबद्दल आमदार महेश बालदी यांचे दोन्ही मान्यवरांनी कौतुक केले.

## विविध विकास प्रकल्पांमध्ये युवा पिढीला संधी मिळणार

त्याचप्रमाणे संघटनेचे अध्यक्ष बी.आर. पाटील, रवींद्रनाथ पाटील, नारायण ठाकूर, मच्छिंद्र नाईक, महेश पाटील, नरेश म्हात्रे, श्री. मोकल, लीलाधर भोईर, नारायण जांभळे, भाऊसाहेब पाटील यांच्यासह पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

या सोहळ्यात दहावी, बारावी, पदवी, पदवीत्तरांसह विशेष गुणवत्ताधारक सभासद, सेवानिवृत्त सभासद तसेच ७० वर्षांवरील सभासदांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये योगिता पाटील, मोहन म्हात्रे, नारायण ठाकूर, गोपी पाटील, डॉ. दिपाली जांभळे, गौतमी म्हात्रे, किशोर म्हात्रे, नरेश म्हात्रे यांना विशेष गुणवत्ताधारक म्हणून गौरविण्यात आले.

## दुखवटा

### सुभाष महाडिक



**मुरुड :** रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाष दत्तात्रेय महाडिक यांचे आज पहाटे नवी मुंबई येथील एम.जी.एम. रुग्णालयात वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी,शैलेश व सुमित ही दोन मुले,सुना,मुलगी ,जावई व नातवंडे असा परिवार आहे.

## निवडक

### पोळपाट डोक्यात पडून मुलगा जखमी

**पनवेल :** तळोजा उपनगरामध्ये इमारतीखाली उभ्या असणाऱ्या मुलाच्या डोक्यात पोळी बनवण्यास लागणारा मार्बलचा पोळपाट पडल्याने तो मुलगा जखमी झाला आहे. तळोजा येथील सेक्टर १०, कैलास टॉवर इमारतीखाली हे घटना घडली आहे. दहावीत असणारा हा मुलगा कैलास टॉवरमधील तळमजल्यावर दुचाकी दुरुस्तीच्या दुकानासमोर उभा होता. याचवेळी या मुलाच्या डोक्यावर मार्बलचे पोळपाट पडल्याने डोक्यात खोलवर जखम झाली. डॉक्टरांनी या मुलावर उपचार केले. डोक्यात तीन ते चार टाके पडले. या मुलाचे वडील वाहन चालविण्याचे काम करतात. या घटनेनंतर तळोजा पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**पनवेल :** रेल्वे स्टेशन येथे आयोजित रक्तदान शिबिराला रक्तदात्यांची उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्नेहदीप फाऊंडेशनचे संस्थापक ऋग्वेद रवींद्र कांडपिळे, ज्ञानेश्वर कदम जे जे हॉस्पिटल ब्लड सेंटर मुंबई पिल्ले कॉलेजचे विद्यार्थी यांच्या सहयोगाने रक्तदान शिबिराचे आयोजन पनवेल रेल्वे स्टेशन येथे सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराला माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ यांची उपस्थिती लाभली रक्तदान शिबिरासाठी मोठ्या संख्येने रेल्वे प्रवासी विद्यार्थी आणि रक्तदाते यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



# मालमत्ता कर सवलतीसाठी शेवटचे तीन दिवस बाकी!

## पनवेल मनपातर्फे नागरिकांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या अभय योजनेच्या माध्यमातून १५ ऑगस्टपर्यंत मालमत्ता कर भरणाऱ्या नागरिकांकरिता विशेष सूट देऊन शास्तीवर ९० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात आली आहे. विशेष सवलत मिळण्याचे शेवटचे तीन दिवस बाकी आहेत. नागरिकांनी लाभ घेऊन आपला मालमत्ता कर पूर्ण भरावा, असे आवाहन पनवेल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे.

अभय योजनेंतर्गत प्रामुख्याने १८ जुलै ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत संपूर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ९० टक्के सूट मिळणार आहे तसेच १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट या कालावधीत संपूर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ७५ टक्के सूट मिळणार. तसेच या पुढील काळात म्हणजे १ सप्टेंबर २०२५ ते १० सप्टेंबर कालावधीत संपूर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ५० टक्के सूट मिळेल आणि ११ सप्टेंबर ते २० सप्टेंबर या कालाधीत संपूर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास असलेल्या शास्तीमध्ये २५ टक्के सूट मिळणार आहे.



ही अभय योजना केवळ एकवेळची विशेष आणि अंतिम बाब म्हणून जाहीर करण्यात आली आहे. या योजनेचा मालमत्ताधारकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

**अभय योजनेला प्रचंड प्रतिसाद**

आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनुसार महापालिकेने मालमत्ता करधारकांसाठी अभय योजना सुरू केली आहे. पनवेल महानगरपालिकेच्या या शास्ती अभय योजनेला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. १८ जुलैपासून सुरू झालेल्या या अभय योजनेंतर्गत आतापर्यंत ११ ऑगस्टपर्यंत १५८ कोटीचा मालमत्ता कर पालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे.

**ऑनलाईन भरणा करून मिळवा शास्तीमध्ये सूट**

१) प्ले स्टोअरमध्ये जाऊन पीएमसी टॅक्स अ‍ॅप किंवा पनवेल कनेक्ट अ‍ॅप डाऊनलोड करावे.
२) अ‍ॅप डाऊनलोड झाल्यावर योग्य ती माहिती भरावी.
३) आपला मालमत्ता टॅक्स पावती क्रमांक अचूक टाकावा.
४) त्यानंतर खाली मालमत्ता कराचे विवरण दिसेल.
५) विवरण योग्य असल्यास पे या ऑप्शनवर क्लिक करावे.
६) त्यानंतर आपण क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, यूपीआय, क्यूआर, कोड यांचा वापर करून मालमत्ता कर भरू शकता.
७) कर भरून झाल्यावर आपली पावती योग्य ती सांभाळून ठेवावी.

# कळंबोली विद्यालयात शाळा अंतर्गत फेरी

## आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा विद्यार्थ्यांना आपली मते प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी आणि वक्तृत्वकौशल्य विकसित करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरत आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शाळा अंतर्गत फेरी उत्साहात झाली.




विद्यार्थ्यांनी माझं स्वप्न, शिक्षणाचं महत्त्व, स्वच्छ भारत, प्लास्टिक मुक्त भारत, मोबाईल नसते तर?, इंटरनेट –वरदान की शाप? अशा विविध विषयांवर जोशपूर्ण आणि प्रभावी भाषणे दिली. स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला, विचार मांडण्याची क्षमता सुधारली आणि स्टेज भीती कमी झाली. या फेरीतून प्रत्येक इयत्तेतून तीन विद्यार्थी पुढील आंतरशालेय फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी स्पर्धात्मक भावना निर्माण झाली असून पुढील फेरीसाठी उत्सुकता वाढली आहे.

कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या पुढाकारातून आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पडत असून शिक्षक, पालक आणि शाळा प्रशासन यांचा मोलाचा सहभाग लाभत आहे.



# उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा!

## विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीच्या गणेशमूर्तींची कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत मंगळवारी (दि.१२) महापालिकेच्या वतीने पिल्लई इंजिनियरिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीच्या गणेशमूर्तीची कार्यशाळा घेण्यात आली.



महापालिकेच्या वतीने पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यावरती भर दिला जात आहे. यासाठी महापालिकेच्या वतीने नागरिकांना पर्यावरणपूरक गणोशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले जात आहे. 'पुढील पिढ्यांना समृद्ध वारसा देण्याच्या दृष्टीने घरातल्या मुलांच्या हस्ते गणेशमूर्ती तयार करून त्याची प्रतिष्ठापना करावी'. या नाविन्यपूर्ण कल्पनेची अंमलबजावणीसाठी उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनुसार पिल्लई इंजिनियरिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी महापालिकेच्या वतीने शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजनकरण्यात आले.

या कार्यक्रमास महापालिकेचे पर्यावरण मनोज चव्हाण,प्राचार्य डॉ.संदिप जोशी, एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. अर्चना इंगोले, प्राध्यापक विनायक सुर्यवंशी, प्राध्यापक दुर्गा राव यांचे सहकार्य मिळाले.

# राज्यस्तरीय मूट कोर्ट स्पर्धेत बीसीटी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) कॉलेज ऑफ लॉ, पनवेलच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय मूट कोर्ट स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. BALLB पाचव्या वर्षातील विद्यार्थिनी यश्वीनी नाईक आणि BALLB चौथ्या वर्षातील विद्यार्थी विवेक जाधव यांनी विद्या प्रतिष्ठानचे वसंतराव पवार लॉ कॉलेज, बारामती यांच्या वतीने ८ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय मूट कोर्ट स्पर्धेत सर्वोत्कृष्ट मेमोरियल पुरस्कार पटकावला.



या स्पर्धेत राज्यभरातील नामांकित विधी महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेमध्ये विधी संशोधन, मसुदा लेखन आणि युक्तिवाद सादरीकरण यावर विद्यार्थ्यांची कसोटी लागली. यशविनी आणि विवेक यांनी त्यांच्या सखोल कायदासंशोधन, तार्किक विचारशक्ती आणि उत्तम प्रकारे सादर केलेल्या लेखी मेमोरियलमुळे परीक्षकांची विशेष दाद मिळवत हा बहुमान प्राप्त केला. या यशस्वी कामगिरीसाठी विद्यार्थ्यांना प्राचार्या डॉ. सानवी देशमुख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच मूट कोर्ट सोसायटीच्या प्रभारी सहाय्यक प्राध्यापिका अपराजिता गुप्ता आणि सहाय्यक प्राध्यापिका अनाम मेहेंदीकर यांचेही समर्पित सहकार्य लाभले.

या घवघवीत यशामुळे केवळ विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचेच नव्हे, तर महाविद्यालयाने दिलेल्या दर्जेदार प्रशिक्षण आणि व्यावसायिक कौशल्यविकासाच्या प्रयत्नांचेही दर्शन घडते. यशविनी नाईक आणि विवेक जाधव यांचे हे यश महाविद्यालयासाठी अभिमानास्पद असून, इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरेल.

# दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक अ‍ॅप

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे कामोठे येथील लोकनेते दि.बा.पाटील विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यक्तिमत्त्वाच्या दृष्टीने विविध उपक्रम राबवले जातात. या उपक्रमामध्ये परिसरातील सामाजिक संघटनांचादेखील सहभाग असतो. सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. विद्यार्थ्यां आणि तंत्रज्ञान यांचा जवळचा एक संबंध निर्माण होत आहे. हा संबंध त्यांना केव्हाही, कधीही अभ्यासासाठी उपयुक्त ठरेल या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ बिझनेस एम्राल्ड मानसरोवर यांच्या वतीने आयडियल स्टडी अ‍ॅपचे वाटप करण्यात आले.



अ‍ॅपची किंमत पंधराशे रुपये असून विद्यालयातील ११० विद्यार्थ्यांना ते रोटरी क्लब ऑफ मानसरोवर यांच्या वतीने मोफत देण्यात आले. या अ‍ॅपमध्ये विद्यार्थ्यांनासाठी डिजिटल पाठ्यपुस्तके, सराव संच सराव प्रश्नपत्रिकांचा समावेश आहे. या डिजिटल अ‍ॅपमुळे विद्यार्थ्यांना अध्ययन करणे सोपे होणार आहे. या कार्यक्रमावेळी रोटरी क्लब ऑफ मानसरोवरचे प्रेसिडेंट संजय रोकडे साहेब, सेक्रेटरी डॉ. रविकिरण धोत्रे, ट्रेनेटर राजेंद्र म्हात्रे, रोटरी क्लबचे सदस्य डॉ. विकास शिंदे डॉ. दिपक खोत, विद्यालयाच्या स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन जयदास गोवारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागीय अधिकारी एम. के. कोंगरे, लेखनिक गोवारी उपस्थित होते.

आपल्या मनोगतातून जयदास गोवारी साहेबांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये आयडियल स्टडी पमुळे नक्कीच वाढ होईल असे सांगितले. विद्यालयाच्या सर्व दहावीच्या विद्यार्थ्यांना हे अ‍ॅप मोफत दिल्याबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक यांनी रोटरी क्लब ऑफ मानसरोवरचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विद्यालयातील एम.डी. गावंड, एस.डी. पाटील, व्ही.व्ही. फडतरे, खुटले, शिपाई मोरे व कोळी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे निवेदन अनिल पाटील यांनी केले.

# सीकेटी विद्यालयात वेशभूषा स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त जनार्दन शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालय येथे पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांच्या वेशभुषा स्पर्धा झाल्या.

या स्पर्धेमध्ये ७१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी व्यवसायिक, भारतीय नेते, छत्रपती शिवाजी महाराज, झाशीची राणी, सावित्रीबाई फुले इत्यादी वेशभूषा सादर केल्या.



# रामशेठ ठाकूर महाविद्यालयातर्फे छत्री रॅली उत्साहात

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवस उपक्रमांतर्गत विज्ञान विभाग व नेचर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.१२) घोषवाक्यांसह छत्री रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.




या रॅलीचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ करण्यात आले तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना रॅलीसाठी शुभेच्छा दिल्या. या रॅलीचा मुख्य उद्देश सामाजिक व पर्यावरणीय प्रश्नांबाबत जनजागृती करणे हा होता. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी छत्र्यांवर सर्जनशील घोषवाक्ये लिहून पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, जलसंवर्धन, प्लास्टिकमुक्ती यासारख्या विविध मुद्द्यांवर प्रभावी संदेश दिले. या उपक्रमात सुमारे ११० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ह्या रॅलीने सेक्टर ३५ रहिवासी परिसर व्यापला होता तसेच स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले व विद्यार्थ्यांच्या कलात्मक सादरीकरणामुळे परिसरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

या उपक्रमाच्या माध्यमातून विज्ञान विभाग व नेचर क्लबने सामाजिक बांधिलकीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला त्याचबरोबर या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाज हितासाठी काम करण्याची भावना जागृत झाली. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्यप्रवृत्तीला प्रेरणास्थान मानून अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. नीलम लोहकरे, रसायनशास्त्र विभाग प्रमुख व प्रा. डॉ. पूजा लांजेकर, समन्वयक नेचर क्लब यांनी केले तसेच दोन्ही विभागातील इतर सर्व सदस्य, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# सर्व खेळांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न -परेश ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे अ‍ॅकॅडमीला शक्य ती सर्व मदत केली जाईल तसेच पनवेल महानगरपालिकेने अनेक खेळांची मैदाने उभारली असून, सर्व खेळांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू राहील, असे प्रतिपादन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी प्रतिक क्रिकेट अ‍ॅकॅडमीच्या स्नेहमेळाव्यात केले.



पनवेल शहरातील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृहात प्रतिक क्रिकेट अ‍ॅकॅडमीचा स्नेहमेळावा नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात अ‍ॅकॅडमीतील गुणवंत आणि यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि रणजीपटू ऋषभ पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा सोमवारी (दि.११) झाला. या वेळी अ‍ॅकॅडमीचे कोच प्रतिक मोहिते, अध्यक्ष अंकल बहिरा, डॉ. संतोष जाधव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. संतोष जाधव यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी अ‍ॅकॅडमीला स्वतःचे मैदान नसल्याने विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणात येत असलेल्या अडचणींवर लक्ष वेधले. त्यानंतर निलेश पाटील यांनी अ‍ॅकॅडमीच्या कार्याविषयी माहिती दिली.

स्नेहमेळाव्यात मुंबई संघात निवड झालेली तनिषा शर्मा, जिओ कपमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारी स्वरा, तसेच रायगड जिल्हा संघात निवड झालेले क्रिश, आराध्य, श्रेय, अर्णव, पार्थ, वेदांत आणि ईशान यांसारख्या गुणवंत खेळाडूंचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक आणि ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. या स्नेहमेळाव्याला अ‍ॅकॅडमीचे विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# आकलन, उपयोजनेवर भर

बदलत्या काळानुसार व कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या तंत्रज्ञानातील बदलांनुसार शालेय परीक्षा पद्धतीतही बदल व्हायला हवा आहे. त्यामुळेच मोदी सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या उद्दिष्टांनुसार ओपन बुक परीक्षेचा पर्याय सीबीएसई बोर्डाने आता अखेर लागू केला आहे. घोकंपट्टीऐवजी विचार करून उत्तर लिहिण्याची क्षमता या परीक्षा पद्धतीतून विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल अशी अपेक्षा आहे.

**अधिक वेगाने माहिती शोधणे शक्य झाले असून यात उपलब्ध माहितीचा घोषवाराही समोर ठेवला जातो. शोधकर्त्याला नेमके काय हवे आहे हे जाणून एआयकडून व्यक्तिगत गरजेनुसार माहिती सादर केली जाते. अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नांची उत्तरेही एआयकडून मिळू शकतात. कुठल्याही विषयावरची माहिती, तिचे विश्लेषण, सारांश असे सारे काही एआयमुळे क्षणात उपलब्ध होते. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जन्मलेली आजची शाळकरी मुले व तरुण एआय तंत्रज्ञानाचा वापर सहजपणे करतात. त्यामुळेच तंत्रज्ञानाच्या बदलत्या स्वरुपाचा साकल्याने विचार करून आपल्या शिक्षणपद्धतीत बदल करणे अत्यावश्यक आहे. भारतात शिक्षण पद्धतीत असे बदल प्रत्यक्षात आणण्यासाठीच नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ म्हणजेच सीबीएसईकडून पुस्तकासह परीक्षेच्या म्हणजेच ओपन बुक परीक्षेच्या पर्यायाची पडताळणी सुरू होती. हा ओपन बुक परीक्षेचा पर्याय सीबीएसई बोर्डाने आता अखेर लागू केला आहे. २०२६-२७च्या शैक्षणिक वर्षापासून नववीच्या वर्गासाठी ओपन बुक परीक्षा लागू होईल. गेली अनेक वर्षे या बोर्डाकडून परीक्षा पद्धतीत बदल करण्यासंदर्भात चर्चा व प्रयोग सुरू आहेत. सध्याच्या परीक्षा पद्धतीत विद्यार्थ्यांची निव्वळ स्मरणशक्ती तपासली जाते असा आक्षेप घेतला जातो. यामुळे विद्यार्थी सध्या फक्त 'घोका आणि उतरवा' याच्या मागे लागतात. त्याऐवजी विद्यार्थ्यांमध्ये पाठ्यक्रमातील संकल्पनांची समज वाढली पाहिजे. त्यांच्यात विश्लेषण करण्याची क्षमता विकसित होऊन त्यांना चिकित्सक विचार करता यायला हवा या उद्देशाने सीबीएसईने हा निर्णय घेतला आहे. निकालकेंद्री परीक्षांमुळे परीक्षांचे महत्त्व नको इतके वाढत असून त्यामुळे विद्यार्थ्यांची विषयाची समज वाढण्याऐवजी विद्यार्थ्यांवरील ताणात तेवढी वाढ होते. मागील शैक्षणिक वर्षांत सीबीएसईने नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांची प्रायोगिक तत्त्वावर ओपन बुक परीक्षा घेतली होती. त्यावरचे शिक्षकांचे अभिप्राय, विद्यार्थ्यांवर या पद्धतीचा दिसणारा परिणाम यांच्या आधारे आता मंडळाने ओपन बुक परीक्षेला मान्यता दिली आहे. ओपन बुक परीक्षेचा अर्थ पुस्तकातून उत्तरे शोधून ती जशीच्या तशी लिहिणे असा होत नाही. प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी विद्यार्थ्यांची संकल्पना स्पष्ट असावीच लागेल तसेच त्यांची समस्यांचे निराकरण करण्याची क्षमताही प्रश्नांमधून जोखली जाईल. भाषा, गणित, विज्ञान आणि सामाजिक शास्त्र या मुख्य विषयांच्या प्रत्येक सत्रातील लेखी परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना पुस्तके आणि अभ्यास साहित्याच्या आधारे परीक्षा देण्याची परवानगी असेल. यासाठीची नमुना प्रश्नपत्रिका तसेच अंमलबजावणीसाठीची मार्गदर्शक तत्त्वे सीबीएसई बोर्डाकडून लवकरच जाहीर केली जातील. कर्नाटक, तामिळनाडू तसेच महाराष्ट्रातही या पद्धतीबाबत विचार सुरू आहे. विद्यार्थ्यांना विषयातील संकल्पना नीट समजल्या आहेत का, त्यांचे उपयोजन विद्यार्थ्यांना करता येते आहे का, तसेच विश्लेषण करण्याची क्षमता त्यांच्यात विकसित झाली आहे का हेच यापुढे परीक्षांमधून तपासले जायला हवे.**

# अवयवदान सर्वश्रेष्ठ दान!

अवयवदान हे एक महान दान आहे, ज्याद्वारे एखाद्या व्यक्तीचा जीव वाचू शकतो. मात्र, समाजामध्ये अवयव दानाविषयी अनेक गैरसमज आणि भीती आहेत, ज्यामुळे अवयव दानाचे प्रमाण खूप कमी आहे. यावर मात करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने 'अंगदान जीवन संजीवनी अभियान' ही विशेष मोहीम सुरू केली आहे. याविषयी आणि अवयव दानाचे महत्व विशद करणारा हा लेख




जगातील पहिले मानवी अवयव प्रत्यारोपण १९५४मध्ये झाले, तर भारतात १९७१मध्ये सीएमसी वेल्लोर येथे करण्यात आले. दुर्दैवाने ७५ वर्षांनंतरही भारतात अवयवदानाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. आज आपल्याकडे जे काही अवयव प्रत्यारोपण होत आहे. त्यात बहुसंख्य थेट संबंधित दात्यांकडून आहेत, तर ब्रेनडेड रुग्णांचे कॅडेव्हरिक अवयवदान नेहमीच मागे राहिले आहे. या उदात्त आणि मानवी कारणासाठी पाश्चिमात्य देशांच्या तुलनेत भारतात दहा हजारांपैकी केवळ एक रुग्ण अवयवदानासाठी संमती देतो, तर पाश्चिमात्य देशांत १० हजार लोकसंख्येपैकी सुमारे ३५०० लोकांमध्ये अवयवदानासाठी संमती मिळते.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अवयव आणि ऊतक प्रत्यारोपण संस्थेच्या आकडेवारीनुसार भारतात एकूण अवयव प्रत्यारोपणाची संख्या १८,९०० आहे तसेच मृत दात्यांची संख्या १,१२८ तर जिवंत दात्यांची संख्या १५,००० आहे. मूत्रपिंड आणि यकृत प्रत्यारोपणासाठी प्रतीक्षा यादीतील रुग्णांची संख्या आणि भारतातील अवयवदान दर प्रति दशलक्ष लोकसंख्येमागे एक टक्क्यापेक्षा कमी असल्याची स्थिती आहे.

वर्ष २०२४च्या अखेरपर्यंत भारतात शेवटच्या टप्प्यातील मूत्रपिंड आणि यकृताच्या आजारांच्या उपचारांसाठी २ लाख मूत्रपिंड आणि १ लाख यकृताची गरज आहे. मात्र दरवर्षी केवळ ४००० मूत्रपिंड प्रत्यारोपण आणि ५०० यकृत प्रत्यारोपण केले जात असून, हजारो रुग्ण नवीन आयुष्य जगण्याच्या संधीच्या प्रतीक्षेत अवयवांअभावी मृत्युमुखी पडत आहेत. हृदयाची परिस्थिती आणखी बिकट असून, पाच हजार रुग्णांना हृदयाची गरज असून केवळ २५३ हृदय प्रत्यारोपण केले जात आहे. तसेच २२० फुफ्फुसांचे प्रत्यारोपण करण्यात आले आहे.

सध्या भारतात सुमारे ५७० अवयव प्रत्यारोपण केंद्र असून केवळ १४० नॉनट्रान्सप्लांट ऑर्गन रिट्रीव्हल सेंटर्स आहेत, जे लोकसंख्येच्या सध्याच्या गरजेनुसार खूपच कमी आहेत. दुसरे म्हणजे यातील बहुसंख्य खाजगी संस्था आहेत, जिथे उपचारांचा खर्च सर्वांना परवडणारा नाही. यावर उपाय म्हणून कमी खर्चाचे परवडणारे प्रत्यारोपण केंद्रांची संख्या वाढविणे आवश्यक आहे.

रस्ते अपघातात दरवर्षी सुमारे दीड लाख लोक मृत्युमुखी पडतात, त्यापैकी अनेक जण उपचारादरम्यान ब्रेनडेड होतात. एक ब्रेनडेड रुग्ण २ मूत्रपिंड, १ यकृत, १ हृदय, २ फुफ्फुस, १ स्वादुपिंड यांचा संभाव्य दाता असून एकाच वेळी ७ जीव वाचवू शकतो. तसेच कॉर्निया, त्वचा, हाडे यासारख्या ऊतींचे दान करू शकतो आणि अपंग रुग्णांना विविध अपंगत्वापासून मुक्त होण्यास मदत करू शकतो.

राज्यातील अवयवदानाचे प्रमाण वाढावे व अवयवदानाच्या प्रतीक्षेतील रुग्णांना नवजीवन मिळावे यासाठी ३ ते १५ ऑगस्टदरम्यान विविध उपक्रमांनी अवयवदान पंधरवडा साजरा होत आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्वत: पुढाकार घेत अर्ज भरून अवयवादानाची शपथ घेतली आणि या अभियानाचा शुभारंभ केला.

अवयवदान ही एक सामाजिक बांधिलकी आहे. समाजामध्ये या विषयाबाबत सकारात्मक मतपरिवर्तन घडवण्यासाठी प्रभावी जनजागृती अत्यावश्यक आहे. मोहिमेतून अवयवदानासंबंधी भीती, गैरसमज व अंधश्रद्धा दूर करून वैज्ञानिक माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे महत्त्वाचे आहे. यासाठी 'अंगदान जीवनदान संजीवनी अभियान' ३ ते १५ ऑगस्टदरम्यान राज्यात राबविण्यात येत आहे. या कालावधीत व्यापक जनजागृती व समाजाभिमूख उपक्रम राबविले जात असून यात शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, धार्मिक संस्था, आरोग्य संस्था व सामाजिक कार्यकर्ते आदींचा सक्रिय सहभाग आहे. या वर्षीच्या मोहिमेचे घोषवाक्य देहदान, महादान, दुसऱ्याला जीवनदान असे आहे.

या मोहिमेंतर्गत अवयवदानाच्या महत्त्वाविषयी जनजागृती करणे, अवयवदानाच्या गैरसमजांवर प्रकाश टाकणे, लोकांना अवयवदान करण्यास प्रोत्साहित करणे, अवयवदात्यांचा सन्मान करणे, गरजू रुग्णांना नवीन जीवनदान देण्यासाठी प्रेरित करण्यासाठी गावे, वाड्या, वस्त्या या ठिकाणी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, समुदाय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत घरोघरी जाऊन मोहिमेची माहिती देऊन अवयव दानाबाबत प्रोत्साहन दिले जाणार आहे.

अवयवदान म्हणजे अशी प्रक्रिया जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःचा अवयव काढून दुसऱ्या व्यक्तीला प्रत्यारोपित करण्यास कायदेशीररित्या परवानगी देते. एकतर दाता जिवंत असताना संमतीने, मृत्यूपूर्वी केलेल्या मृत देणगीसाठी कायदेशीर परवानगीद्वारे किंवा कायदेशीर जवळच्या नातेवाईकाच्या परवानगीद्वारे मृत देणगीसाठी परवानगी दिली जाते. देणगी संशोधनासाठी असू शकते किंवा सामान्यतः, निरोगी प्रत्यारोपण करण्यायोग्य अवयव आणि ऊती दुसऱ्या व्यक्तीमध्ये प्रत्यारोपित करण्यासाठी दान केली जाऊ शकतात.

प्रत्यारोपणामध्ये मूत्रपिंड, हृदय, यकृत, स्वादुपिंड, आतडे, फुफ्फुसे, हाडे, अस्थिमज्जा, त्वचा आणि कॉर्निया यांचा समावेश होतो. काही अवयव आणि ऊती जिवंत दात्यांद्वारे दान केल्या जाऊ शकतात, जसे की मूत्रपिंड किंवा यकृताचा काही भाग, स्वादुपिंडाचा काही भाग, फुफ्फुसांचा काही भाग किंवा आतड्यांचा काही भाग, परंतु बहुतेक देणग्या दात्याच्या मृत्यूनंतर होतात.

अवयवदान अनेक लोकांचे जीव वाचवू शकते. एका व्यक्तीच्या अवयवदानाने अनेक गरजू लोकांना नवीन जीवन मिळू शकते. अवयवदान करणे म्हणजे एक सामाजिक कार्य आहे. यामुळे समाजाला मदत होते आणि गरजू लोकांना आरोग्यदायी जीवन जगण्याची संधी मिळते. अवयवदानामुळे एखाद्या व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात पुनर्जन्म मिळतो, असे मानले जाते. अवयव निकामी झालेल्या किंवा गंभीर वैद्यकीय परिस्थितीत असलेल्या लोकांना अवयवदानामुळे जीवनात दुसरी संधी मिळते.

अवयवदानाबद्दल गैरसमज : काही लोकांना अवयवदानाच्या बाबतीत धार्मिक गैरसमज आहेत, मात्र अनेक धर्म अवयवदानाचे समर्थन करतात. काही लोकांना असा गैरसमज आहे की अवयवदानामुळे मृत्यूनंतर अंत्यसंस्कारांना उशीर होतो, मात्र अवयवदान प्रक्रिया कमी वेळेत पूर्ण केली जाते. काही लोकांना वैद्यकीय गैरसमज आहेत की, अवयवदान केल्यास त्यांचे शरीर पूर्णपणे निकामी होईल, परंतु अवयवदान करताना डॉक्टरांकडून आवश्यक ती काळजी घेतली जाते.

अवयवदान करण्यासाठी, तुम्ही राष्ट्रीय अवयव आणि ऊती प्रत्यारोपण संस्थेच्या संकेतस्थळावर किंवा इतर मान्यताप्राप्त अवयवदान संस्थांमध्ये नोंदणी करू शकता. अवयवदान करण्यापूर्वी आपल्या कुटुंबातील सदस्यांशी याबद्दल चर्चा करणे महत्वाचे आहे. त्यांना आपल्या निर्णयाबद्दल माहिती देणे आणि त्यांची संमती घेणे आवश्यक आहे. अंगदान जीवनदान संजीवनी अभियान दि.३ ते १५ ऑगस्टपर्यंत चालणार असून, या कालावधीत सर्व आरोग्य संस्थेमध्ये, गाव, वाडी, वस्ती इत्यादी ठिकाणी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, समुदाय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत घरोघरी जाऊन मोहिमेची माहिती देऊन अवयव दानाबाबत प्रोत्साहन दिले जाणार आहे. या मोहिमेत जास्तीत जास्त नागरीकानी सहभागी होउन मोलाचे दान करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

सुनील देशपांडे यांची अवयवदान प्रतिज्ञा राज्य शासनाने अधिकृतपणे अवयवदान प्रतिज्ञा म्हणून घोषित केलेली आहे.

**'अवयवदान प्रतिज्ञा'**

'माणुसकी हा माझा मूळ धर्म आहे. पीडीतांच्या व गरजूंच्या जीवनात आनंद फुलवणे हीच माणुसकीची खरी शिकवण आहे, अशी माझी श्रद्धा आहे. अवयवदानामुळे गरजू रुग्णांच्या जीवनात आनंद फुलविणे शक्य आहे तसेच मृत्यूपंथाला लागलेल्या व्यक्तीला नवा जन्म देता येतो. त्यामुळे हे सर्वात मोठे पुण्यकर्म आहे यावर माझा विश्वास आहे. मी प्रतिज्ञा करीत आहे की, माझ्या शरीरात जे जे अवयव दुसऱ्या मानवाच्या जीवनात आनंद फुलवू शकतील अशा अवयवांवर माणुसकीचा पहिला हक्क व अधिकार असेल. माझ्या अवयवांचा अशा माणुसकीच्या पुण्यकार्यासाठी उपयोग झाला पाहिजे, असा माझा आग्रह आहे. माझ्या पुढील पिढ्यांनी या आग्रहाचा मान राखावा म्हणून मी त्यांना सतत स्मरण देत राहीन आणि पुढील पिढ्यांवर असेच संस्कार व्हावेत यासाठी मी प्रयत्नशील राहीन.'

महाराष्ट्र राज्यातील अवयवदानाशी संबंधित सर्व समस्या सोडविण्यासाठी आणि त्याचा अधिकाधिक प्रमाणात प्रसार करण्याच्या दृष्टिकोनातून 'अंगदान जीवन संजीवनी अभियान' नक्कीच मदतीचे ठरेल.

**-विजय राऊत,**
**सहाय्यक संचालक (माहिती)**




## मोबाईल हँग होतोय... जाणून घ्या कारणे व उपाय

आजच्या २१व्या युगात अन्न वस्त्र आणि निवारा याबरोबरच मोबाईल फोन ही सुद्धा एक जीवनावश्यक गरज बनली आहे. मोबाईलचा दैनंदिन जीवनातील वापर हा खूप मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. अत्यावश्यक गरजांपैकी एक म्हणून आज मोबाईलकडे पहिले जाते. मात्र याच मोबाईलचा वापर करून अनेक सायबर क्राइमही घडलेले आपल्याला पाहा...



आज इतर क्राइम बरोबरच मोठ्या प्रमाणावर सायबर क्राईमही वाढले आहेत. त्यात मोठा तोटा म्हणजे यामध्ये आरोपीला सहज पकडणे शक्य होत नाही. आपली माहिती मोबाईलमुळे इतरांना कळू शकते. त्यामुळे आपले मोठे नुकसान होऊ शकते. अनेकदा बँक खातेही खाली होण्याचा धोका संभवतो. अश्या परिस्थितीमध्ये तुमचा फोन जर हँग होत असेल तर तुम्ही समजून जा तुमचा फोन कोणीतरी ऑपरेट करतोय असा त्याचा अर्थ होतो. यासाठी कोणकोणते संकेत आहेत ते जाणून घेऊया...

१)स्क्रीन फ्रीझ होते - तुम्ही टच केल्यावर स्क्रीन काही क्षण किंवा खूप वेळ प्रतिक्रिया देत नाही.

२)अँप उघडायला वेळ लागतो - कोणतेही अँप उघडताना किंवा वापरताना खूप वेळ लागतो किंवा अँप क्रॅश होतो.

३)फोन रीस्टार्ट करावा लागतो - वारंवार हँग झाल्यामुळे तुम्हाला मोबाईल बंद करून पुन्हा सुरू करावा लागतो.

४)फोन खूप गरम होतो - वापरत असताना फोन जास्त गरम होतो, जे हँग होण्याचं लक्षण असू शकतं.

५)बॅटरी लवकर संपते - फोनची बॅटरी आधीपेक्षा जास्त वेगाने संपत असेल तर मेलवेअर किंवा स्पायवेअर बॅकग्राउंडमध्ये फोन हँग झाला आहे हे समजावे.

यापासून सावध राहण्यासाठी तुमचा फोन फॅक्टरी डाटा रिसेट करा म्हणजे तुमच्या फोनमधील धोकादायक व्हायरस ही डिलीट केला जाईल. त्याचबरोबर कोणत्याही अज्ञात लिंक्सवर क्लिक करू नका आणि कोणालाही ओटीपी आणि पासवर्ड कोणाशीही शेअर करू नका. या आणि अश्या काही गोष्टी लक्षात ठेवून आपण जर आपला मोबाईल हाताळला तर तुम्ही तुमचे मोठे नुकसान होण्यापासून स्वतःला वाचवू शकता.

# बालकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे



**निमित्त**


हिरवे हिरवेगार गालिचे - हरित तृणाच्या मखमालीचे ;त्या सुंदर मखमालीवरती - फुलराणी ही खेळत होती. बालकवींची ' फुलराणी ' ही नितांतसुंदर कविता मराठी भाषेतील काव्यसौंदर्याचे एक मनोहर शब्दशिल्प आहे. या कवितेतील कल्पकता, तिचे भाषावैभव, भावलाघव हे सगळे इतके मोहक आहे की, बालकवी म्हटल्यावर फुलराणीचीच आठवण व्हावी. बालकवी यांचा जन्म १३ ऑगस्ट १८९० रोजी खान्देशात धरणगाव येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव त्र्यंबक बापूजी ठोंबरे. बालकवी यांना चार भावंडे होती. मनुताई (जिजी), अमृतराव, कोकिळा आणि भास्कर (बाबू) या भावंडांत बालकवी यांचा क्रमांक तिसरा. त्यांचे वडील पोलीस खात्यात फौजदार होते. त्यांचे नाव बापूराव आईचे नाव गोदूबाई उत्तम गृहिणी आणि अध्यात्मिक प्रवृत्तीच्या होत्या. अतिशय सर्वसाधारण असे हे कुटुंब होते.

बालपणापासूनच त्यांना निसर्गाची प्रचंड ओढ. नदीकिनारी जाऊन शांतपणे निसर्गाची रूपे न्याहाळणे हा त्यांचा छंद. १९०३ साली बालकवी यांचे मराठी शिक्षण संपले. इंग्रजी शिक्षणासाठी ते धुळ्याला गेले, पण तिथे वर्षभरच राहिले. वयाच्या १३ व्या वर्षीच त्यांनी पहिली कविता लिहिली. पुढे ते राष्ट्रीय शाळेत शिक्षण घेऊ लागले. तो काळ देशभक्तीने भारलेला होता

बालकवी यांनी काही सामाजिक कविताही लिहिल्या. वयाच्या १५व्या वर्षी राष्ट्रीय कीर्तनकार श्री रा. कृ. वैद्य यांचा सहवास त्यांना लाभला. १७व्या वर्षी त्यांच्या जीवनात एक अतिशय महत्त्वाची घटना घडली. जळगाव येथे १९०७ साली कविसंमेलन झाले. या संमेलनात बालकवी यांनी ही आपली कविता सादर केली 'अल्पमती मी बालक नेणे काव्याशास्त्रव्युत्पत्ती' ही कवितेची पहिली ओळ. जमलेल्या मोठमोठ्या कवींनी त्यांचे खूपखूप कौतुक केले, शाबासकी दिली. संमेलनाचे अध्यक्ष कर्नल कीर्तिकर आणि रेव्ह. टिळक यांनी त्यांना बालकवी हा किताब दिला

वयाच्या १८व्या वर्षी बालकवी यांचा विवाह झाला. वडील वारल्यानंतर वर्षाच्या आत विवाह करायचा, अशी रुढी असल्याने त्यांनी हा विवाह नाखुशीनेच केला. त्यावेळी त्यांच्या पत्नीचे वय होते सात वर्षे. प्रापंचिक जीवन उपजीविकेचे निश्चित साधन नसल्याने अस्थिर झाले होते. मोठ्या कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली होती. रेव्ह. टिळकांच्या परिचयातून अहमदनगरच्या अमेरिकन मिशन हायस्कूलमध्ये पाचव्या इयत्तेत त्यांनी नाव घातले. १९११च्या अखेरीस ते पुण्याला गेले. 'केसरी' वृत्तपत्रात काहीकाळ नोकरी केली. त्यांची भ्रमंती थांबत नव्हती. ५ मे १९१८ हा त्यांच्या जीवनातील काळा दिवस. आपल्याच तंद्रीत रेल्वे रुळातून चालत असताना त्यांचा अपघाती मृत्यू झाला. जळगावला त्यांच्या मित्राकडे त्यांना जायचे होते. पण मृत्यूने त्यांना ओढून नेले. अवघे २८ वर्षांचे आयुष्य त्यांना लाभले. एवढ्याशा अल्प जीवनात एक श्रेष्ठ कवी म्हणून त्यांनी अवघ्या महाराष्ट्राचे मन जिंकले. बालकवी यांनी काही बालकथाही लिहिल्या. प्राणी-वनस्पती यांच्यावर या बालकथा आधारित आहेत. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# पुरुषांनाही होतो स्तनाचा कर्करोग; 'ही' आहेत लक्षणे

जगभरात महिलांमध्ये स्तनाचा कर्करोग वेगाने वाढताना दिसत आहे. दरवर्षी सामान्यपणे दोन लाख नवीन स्तनाच्या कर्करोग रुग्णांचे निदान होते, पण केवळ महिलांमध्येच नव्हे तर पुरुषांमध्येही स्तनाचा कर्करोग होऊ शकतो असे तज्ज्ञ सांगतात. ४० ते ७० वयोगटातील अनेक पुरुषांवर स्तनाच्या कर्करोगाचे परिणाम होतो. भारतात याबाबत कोणतीही आकडेवारी नसली तरी अमेरिकेत दरवर्षी साधारणत: २८०० नवीन प्रकरणांचे निदान केले जाते. पुरुषांच्या स्तनामध्ये जास्त चरबी नसते त्यामुळे कर्करोग फुफ्फुस, यकृत, हाडे आणि मेंदूमध्ये वेगाने पसरतो.



पुरुषांमध्ये स्तनाचा कर्करोग दूर्मिळ कर्करोग असून जो पुरुषांच्या ऊतींमधील पेशींच्या वाढीपासून सुरु होतो. स्तनाचा कर्करोग महिलांमध्ये खूप सामान्य असला तरी पुरुषांनाही हा कर्करोग होतो. बहुतेकवेळा वृद्ध पुरुषांमध्ये हा रोग अधिक दिसतो असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. पुरुषांमध्ये स्तनाच्या कर्करोगाची दिसणाऱ्या लक्षणांमध्ये छातीवर वेदनारहित ढेकूळ किंवा त्वचा जाड होणं, स्तनाग्रहात बदल, त्वचेचा रंग किंवा स्केलिंग बदलणे किंवा स्तनाग्रहातून रक्तस्राव होणे अशा लक्षणांचा समावेश आहे.

पुरुषांना स्तनाचा कर्करोग नक्की कशामुळे होतो हे तितकेसे स्पष्ट नसले तरी दुधाच्या नलिकांमध्ये सुरु होणारा कर्करोग ज्याला डक्टल कार्सिनोमा म्हणतात. यासाह दूध उत्पादक ग्रंथींमध्ये सुरू होणारा लोब्युलर कार्सिनोमा हे काही दुर्मिळ कर्करोग पुरुषांमध्ये दिसून येतात. यामध्ये उतीला दाह, जळजळ अशा स्वरूपाचा त्रास संभवतो.

वयानुसार पुरुषांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचा धोका वाढतो. जगभरात निदान करण्यात आलेल्या रुग्णांमध्ये कर्करोग झालेल्या रुग्णाचं वय हे ५० ते ६० वर्षांच्या पुढचे दिसून आल्याचे डॉक्टर सांगतात. कौटुंबिक इतिहास असेल तर पुरुषांमध्ये हा कर्करोग होण्याची शक्यता बळावते, तसेच लठ्ठपणा हेदेखील स्तनाच्या कर्करोगाचं एक कारण आहे. यासाठी लक्षणे दिसून आल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. मॅमोग्राफी हा स्तनाचा कर्करोग लवकर शोधण्याचा प्रभावी मार्ग असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे जर काही वाटले तर अशा पद्धतीने तपासणी करणे केव्हाही चांगले.

# रायगड जिल्ह्यात अष्टविनायक क्षेत्री भाविकांची गर्दी

## वरदविनायकाच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच रांगा

**खोपोली : प्रतिनिधी**

पवित्र श्रावण महिन्यात योग आलेल्या अंगारकी चतुर्थी निमित्ताने मोठ्या प्रमाणावर गणेशभक्त महड अष्टविनायक क्षेत्र येथे, वरदविनायकाच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच दाखल झाले. भाविकांना कोणतीही गैरसोय निर्माण होऊ नये यासाठी गणपती संस्थान विश्वस्त मंडळ, गावकरी, व्यवस्थापन समिती सहित खालापूर पोलिसांकडूनही ही प्रभावी नियोजन करण्यात आले होते .

अंगारकी निमित्ताने हजारोंच्या संख्येने भाविक वरदविनायकाच्या दर्शनासाठी उपस्थित राहिले, भाविकांची मंदियाळी वरदविनायकाच्या दर्शनासाठी लोटली होती. वाहतूक नियोजन, वाहने पार्किंग सहित रांगेत शिस्तबद्धपणे सर्व गणेश भक्तांना वरदविनायकाचे दर्शन मिळण्यासाठी व्यवस्था करण्यात आली. याही अंगारकीला सभामंडपात भव्य फुलांची रांगोळी काढली गेली होती तसेच आकर्षक फुलांची



आरास ही करण्यात आली होती.यासाठी महड अष्टविनायक क्षेत्र विश्वस्त मंडळाच्या कार्यवाह अॅड मोहिनी ताई वैद्य जातीने लक्ष घालत होत्या. खालापूरचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पोलीस पथक नियुक्त बंदोबस्तासाठी नियुक्त करण्यात आले होते.

महामार्गापासून महड देवस्थानपर्यंतच्या रस्त्यावर कोणत्याही प्रकारची वाहतूक अडचण निर्माण होऊ नये यासाठी खास उपाययोजना करण्यात आल्या होत्या. स्थानिक गावकरी व सामाजिक कार्यकर्ते ही याकामी मदत करीत होते अंगारकी योग निमित्ताने अष्टविनायक क्षेत्र महड सोबतच तालुक्यातील विविध गणेश मंदिरातही मोठ्या प्रमाणावर धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

## ◆ बल्लाळेश्वराच्या दर्शनाला २५ हजारपेक्षा जास्त भाविक

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील प्रख्यात धार्मिक स्थळ असलेल्या अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत अंगारकी संकष्टी चतुर्थीला मंगळवारी (ता.१२) भाविकांनी गर्दी केली होती. श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पहाटे पासूनच लांब रांगा लागल्या होत्या. पालीत अंदाजे २५ हजार हून अधिक भाविक दाखल झाले होते.

श्री बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली होती. श्री. बल्लाळेश्वरला देखील आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते. तसेच मंदिरा बाहेर रांगोळी देखील काढण्यात आली



होती. श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रभरातून व भारतातून भाविक दाखल झाले होते. यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल झाली असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत.

भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक, लॉजिंग बोर्डिंग वाले, पापड, लोणचे मिरगुंड विक्रेते, पेढेवाले, छोटे मोठे दुकानदार व इतर व्यावसायिकांचा धंदा तेजीत होता. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. विविध वस्तूंनी भरलेली दुकाने व गर्दी यामुळे मंदिर परिसर गजबजलेला दिसत होता. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते.

अनेक भाविक स्वतः ची वाहने घेवून आले होते, तर काही लक्झरी किंवा खाजगी बसेसने आले. यामुळे पालीतील रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती.

## ‘प्रवीणभाऊंसारखं होण्याची प्रेरणाही विद्यार्थ्यांना मिळावी’

**पोलादपूर : प्रतिनिधी**

राज्यातील विविध औद्योगिक, कृषीपूरक तसेच शैक्षणिक संस्थांना मुंबै बँकेमार्फत भरीव आर्थिक मदत करून उभारी देताना पोलादपूर तालुक्यातूनही असे प्रस्ताव येण्याची अपेक्षा आहे. उपस्थितांकडून आपणाबद्दल जी माहिती दिली जाते; त्यामागे प्रवीणभाऊंसारखं होण्याची प्रेरणा पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मिळावी हा हेतू आहे, अशी प्रांजळ अपेक्षा आमदार प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केली.

कोतवाल बुद्रुक येथील काळकाई माता क्रीडा व सामाजिक संस्थेतर्फे स्पोर्टस गणवेश वाटपाचा कार्यक्रम पोलादपूर येथील कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला असता आमदार दरेकर बोलत होते.



याप्रसंगी व्यासपिठावर गटविकास अधिकारी दिप्ती गाट, संस्थेचे अध्यक्ष राजेश सकपाळ, मागाठणे महामंत्री कृष्णकांत दरेकर, भाजप नेते बिपीन महामुणकर, महेश शिंदे आणि अनिल मोरे, प्रसन्ना पालांडे, माजी राजिप सदस्य मुरलीधर दरेकर,भाजपमंडळ अध्यक्ष वैभव चांदे, नरवीर रेस्क्यू टीमचे रामदास कळंबे, उद्योजक सुनील पवार, जमीर धामणकर, शिवसेना तालुकाप्रमुख निलेश अहिरे, मनसे तालुकाध्यक्ष दर्पण दरेकर, ज्येष्ठ शिवसैनिक दशरथ उतेकर, शिक्षक परिषद जिल्हाध्यक्ष विजय पवार, महाराष्ट्र शिक्षक परिषद राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, कोतवाल बुद्रुक सरपंच रेखा दळवी, भाजयुमोचे महेश निकम, शिक्षकनेते सोपान चांदे, रायगड जिल्हा शिक्षक परिषदेचे अध्यक्ष विजय दरेकर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

यांप्रसंगी कोतवाल बुद्रुकच्या काळकाई माता क्रीडा व सामाजिक संस्थेतर्फे पोलादपूर तालुक्यातील सर्व प्राथमिक शाळा आणि माध्यमिक शाळांच्या २० खेळाडूंना स्पोर्टस गणवेशाचे वाटप मान्यवरांच्याहस्ते करण्यात आले. याप्रसंगी पोलादपूर एसटी स्थानकातून सुटणाऱ्या सर्व बसेसना कोतवाल बुद्रुकच्या काळकाई माता क्रीडा व सामाजिक संस्थेतर्फे नामफलक देण्यात आले


आ.प्रवीण दरेकर यांनी, राज्याच्या राजकारणामध्ये पोलादपूरचा भुमिपुत्र पुढे जातोय पण पोलादपूर तालुक्यात दुसरा भुमीपुत्र त्याच्या विचारांनी प्रेरित होऊन पुढे येताना दिसून आला नाही, अशी खंत व्यक्त करताना पोलादपूरचे जे काही प्रश्न आहेत ते सोडविण्यासाठी मार्गी लावण्यासाठी प्रवीण दरेकर कधीही कमी पडणार नाही, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी अनेक मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन दरेकर यांनी केले.

## भातशेती बहरतेय, मात्र कृषी क्षेत्रात होतेय घट

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील शेती बहरत आहे. यावर्षी पावसाळा मे महिन्यात झाली. त्यामुळे धुळवाफे करता आले नाही. शेवटी राहू व नांगरणी करून राब तयार करून लावणी केली आहे.ही लावणी केल्यानंतर डोंगराळ दुर्गम भागातील वरकस व खडकाळ जमिनीला लागणारा पाऊसाचे प्रमाण योग्य पडत असल्याने भातशेती बहरत जात आहे.यावर्षी भातशेतीत कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांनी नवनवीन पध्दतीचा वापर करून लागवड केली आहे.

यावर्षी तालुक्यात अंदाजे ९५० हेक्टर क्षेत्रावर भातशेतीची लागवड केली आहे.हे भात शेती



लागवडीचे क्षेत्र कमी कमी होत आहे.हे धोक्याचे आहे.पुढे पुढे शेतीचे क्षेत्रकमी होत गेले तर भाताचे उत्पादन कमी होईल. रायगड जिल्हा हा भाताच्या कोठारासाठी प्रसिद्ध आहे. जर का असे क्षेत्र कमी झाले.तर पुढे ही प्रसिद्धी राहील का असा ही प्रश्न पुढे येऊ शकतो.

मागीलवर्षी तळा तालुक्यात १२०० हेक्टर क्षेत्रावरती भात लागवड केली होती. यावर्षी अंदाजे ९५० हेक्टर क्षेत्रावरती भातशेती लागवड झाली आहे.मात्र नाचणी लागवड क्षेत्रात वाढ दिसते २९१.५८ हेक्टर क्षेत्रावर नाचणीची लागवड केली आहे.सामुहीक शेती व महिला बचतगटांमार्फत सामुहिक शेतीला प्राधान्य मिळत असल्याचे पहावयास मिळत आहे.

## आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या सूचनेनुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग आणि प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम झाला.

कार्यक्रमास श्रीमती तेजस्विनी निराळे, वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश व सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग, अॅड. निलोफर शेख व अॅड. तन्मय म्हात्रे, Assistant LADCS हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. पी.एन.पी. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रविंद्र पाटील, NSS अधिकारी दिनेश पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. गणेश पाटील, क्रीडा विभाग प्रमुख तेजस म्हात्रे, संचालक विकांत वारडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तेजस म्हात्रे यांनी केले. अॅड. निलोफर शेख यांनी आंतरराष्ट्रीय युवा दिन, रॅगिंगविरोधी कायदे व वाहतुकीचे नियम याबाबत मार्गदर्शन केले, तर अॅड. तन्मय म्हात्रे यांनी जागतिक आदिवासी दिन व विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात तेजस्विनी निराळे यांनी कायद्याचे ज्ञान, जबाबदार नागरिकत्व व १५१०० नालसा हेल्पलाईनची माहिती विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत दिली.

कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने झाला. एकूण ४४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाकडून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे विशेष आभार मानण्यात आले.

## फार्मर आयडी न काढल्यास शासकीय लाभ नाही!

**कर्जत : प्रतिनिधी**

ज्या प्रमाणे प्रत्येक माणसाची ओळख आधारकार्ड आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक शेतकऱ्याची ओळख म्हणून शासनाने शेतकरी ओळख म्हणून फॉर्मर आयडी काढण्यासंदर्भात ऑग्रीस्टॅक ही योजना सुरु केली आहे. कर्जत तालुक्यात ज्या व्यक्तीच्या नावे शेतीचा ७/१२ उतारा आहे. त्या शेतकऱ्यांनी तात्काळ जवळच्या महा - ई सेवा केंद्रावर जाऊन फॉर्मर आयडी तयार करून घ्यावी. शेतकऱ्यांशी संबंधित सर्व लाभ घेण्यासाठी फॉर्मर आयडी आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी जर फॉर्मर आयडी तयार करून घेतले नाही तर त्यांना शासकीय लाभ मिळणार नाहीत. असे कर्जतचे तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी माहिती पत्राद्वारे सूचित केले आहे.

पी. एम. किसान सन्मान निधी योजना, नमो शेतकरी योजना, पीक विमा योजना, पीक कर्ज मिळणे, कर्ज माफीचा लाभ, धान खरेदी, नैसर्गिक आपत्ती पीक नुकसान लाभ, जमीन विक्री तसेच कृषी विषयक सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने फॉर्मर आयडी तयार करून घेणे अत्यावश्यक आहे. शेतकऱ्यांचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होऊ नये म्हणून शेतीचे ७/१२ नावे असलेल्या सर्व शेतकऱ्यांनी तात्काळ फॉर्मर आयडी तात्काळ करून घ्यावी. असे आवाहन डॉ. जाधव यांनी केलेय.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-शिवकर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./ हिस्सा.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ३१५ | ०-९४-६०<br>०-०३-००<br>एकूण ०-९७-६०<br>पैकी ०-९०-६० | ९.५६ | श्री. नारायण पदू पाटील व इतर ५३ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १३/०८/२०२५** **सही/-**
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१


## कलोते धरणात बुडून तरुणाचा मृत्यू

**खालापूर, चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील कलोते धरण परिसरात पोहण्यासाठी गेलेल्या एका तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (दि. १२) घडली. अभय शिवाजी राऊत (वय २३, रा. माजलगाव, जि. बीड) असे मयत तरुणाचे असून तो खालापूर तालुक्यातील लाईफ अॅण्ड जॉय या रिसॉर्टमध्ये कामगार म्हणून चार दिवसांपूर्वीच रूजू झाला होता.

अभयने मंगळवारी दुपारी ११च्या सुमारास जिन्स आणि टी-शर्ट घालून धरणाच्या पाण्यात उडी मारली, मात्र पोहण्याचे अंतर जास्त असल्याने दमछाक होऊन त्याचा बुडून मृत्यू झाला, अशी प्राथमिक माहिती आहे. खालापूर पोलिसांनी हेल्प फाऊंडेशन आणि अपघातग्रस्त संस्था यांच्या मदतीने शोधमोहीम करून तीन तासांच्या प्रयत्नाअंती मृतदेह शोधून काढला. त्यानंतर शवविच्छेदनासाठी मृतदेह खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आला आहे.

## संशोधक शेतकरी मिनेश गाडगीळांना कृषी गौरव पुरस्कार

**रसायनी : प्रतिनिधी**

वसंतराव नाईक प्रतिष्ठानचा कृषी गौरव पुरस्कार गुळसुंद्याचे संशोधक शेतकरी मिनेश मोहन गाडगीळ यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार त्यांना कोकण विभागातून मिळणार आहे. कोकण विभागात दोघेजण आहेत, ज्यामध्ये गाडगीळ यांचे नाव आहे.



पुरस्कार सोहळा १८ ऑगस्ट रोजी पुसद येथे होणार असून त्याच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे हे प्रमुख अतिथी, तर राज्यमंत्री इंद्रनील नाईक या सोहळ्याचे स्वागताध्यक्ष आहेत. हा कार्यक्रम पुसद येथे होणार आहे. संपूर्ण राज्यातून १३ जणांची या पुरस्कारासाठी निवड झालेली आहे. कोकण विभागातून कृषीभूषण मिनेश गाडगीळ यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. गुळसुंदे येथे त्यांनी उत्पादित केलेल्या नाविन्यपूर्ण विविध रंगीत तांदळाची व कृषी क्षेत्रातील त्यांच्या संशोधनाची प्रतिष्ठानच्या माध्यमातून दखल घेण्यात आली आहे.

## पन्हाळघर बुद्रुक आदिवासीवाडीतील ट्रान्सफॉर्मर दुरूस्त; वीजपुरवठा पूर्ववत

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील पन्हाळघर बुद्रुक आदिवासीवाडी येथील ट्रान्सफॉर्मर बराच काळ बंद अवस्थेत होता. तसेच अंबर्ले येथील दोन विजेचे खांब पडल्यामुळे पन्हाळघर बुद्रुक येथील ट्रान्सफॉर्मरवर सर्व लोड येत होता, परिणामी पर्यायी विद्युत पुरवठा कमी होत होता.



या समस्येबाबत स्थानिक नागरिकांनी एमएसईबीच्या कार्यालयात जाऊन उपविभागीय अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. तक्रार मिळताच कार्यकारी अभियंता आर. जे .पाटील यांनी तात्काळ दखल घेऊन उपकार्यकारी अभियंता अर्जुन प्रल्हाद राठोड सहाय्यक अभियंता मंदार शिंदे गोरेगाव शहर, धनंजय पाटील साह्यक अभियंता गोरेगाव ग्रामीण, वार पी.बडिया साह्यक अभियंता लोणेरे शाखा, आफिस जे.ई. ज्ञानेश्वर लाड, लाईनमन केशव जांबरे, सुरेंद्र शिर्के वायरमन, सोमेश्वर काळसरपे वायरमन, हार्षद सालदूर वायरमन,रुपेश नळावडे वायरमन, संकेत अंधेरे वायरमन,प्रसाद धाडवे, भावेश धोंडगे ,रुषभ पवार यांच्या सोबत प्रत्यक्ष जागेवर भेट देऊन लाईनमन व वायरमन यांच्या मदतीने पाहणी केली.

तत्काळ कारवाई करत पडलेले दोन खांब उभे करण्यात आले तसेच आदिवासी वाडीतील व उभारेवाडी येथील ट्रान्सफॉर्मर नवीन बसविण्यात आले.या कार्यवाहीमुळे पन्हाळघर परिसरातील विद्युत पुरवठा पूर्ववत सुरू झाला असून पन्हळघर विभागातील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. लाईनमन व वायरमन यांच्या मोलाच्या सहकार्याबद्दल स्थानिकांनी आभार मानले.


राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E –TENDER NOTICE(THIRD CALL)**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-16/III[rd] Call/ 2025-26 Dtd.13.08.2025 RFX No. 7000037158 | **Sub.:-** Third Call for SRM E-Tender for various regular preventative maintenance/ emergency and breakdown works of various 220KV & 100KV Substations under EHV O&M Dn. Mahad for the year 2025-26. | Rs. up to 10,00,000/- (Including GST+ 1% Labour CESS) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST
**Bid submission is from 13.08.2025 @ 00:00 hrs to 22.08.2025 @23:59Hrs for above tender**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.8793505100
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

-Sd-
**Executive Engineer (I/c)**
**EHV(O&M) Dn. Mahad**



## त्रिवेणी संगम सिहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.

नोंदणी क्र. एनबीओएम/सिडको/एचएसजी/(ओएच)/३९६/
जेटीआर-सन १९९५-९६ भूखंड क्रं. १२, सेक्टर ८, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल (प.), नवी मुंबई, ४१० २०६

**पुनर्विकास निविदा सूचना**

त्रिवेणी संगम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., या संस्थेच्या इमारत पुर्नबांधणी कामाकरिता पुरेशी संसाधने आणि अनुभव असलेल्या प्रतिष्ठित अनुभवी आणि अर्थिक दृष्ट्या सक्षम विकासकाकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

**प्रकल्पाचे वर्णन**

सिडको /पनवेल महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील विद्यमान इमारत पाडणे आणि इमारतीचा पुनर्विकास सर्व प्राधिकरणाच्या अवश्यक त्या परवानग्या घेऊन करणे.

**संस्थेचे नाव :- त्रिवेणी - संगम सिहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**संस्थेचा पत्ता :- भूखंड क्रं. १२, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.), नवी मुंबई, ४१० २०६०**

**प्रकल्प माहिती**

**१. एकूण भूखंड क्षेत्रफळ १८७२ चौ. मी.**
**२. विद्यमान सभासद संख्या : ७० सदनिकाधारक**
३. निविदा फॉर्म दि. १४/०८/२०२५ ते १७/०८/२०२५ या दिवशी सकाळी १०.३० ते १२.३० पर्यंत संस्था कार्यालयात मिळतील. निविदा फॉर्मची किमंत रु.५०००/- राहिल सदरची रक्कम रेखांकित धनादेशाने जमा करावेत.
संपर्क ७५८८६८३९११ व ८६५५०३५९७३
निविदा सादर करण्याची तारीख १५/०८/२०२५ वे २१/०८/२०२५ सकाळी १०.३० ते १२.३० पर्यंत संस्था कार्यालयात.

**सही/-** **सही/-** **सही/-**
**मा. चेअरमन** **मा. सचिव** **मा. खजिनदार**
**त्रिवेणी संगम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.**

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा

## नवी मुंबई मनपाचे भाविकांना आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**


महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने वर्षभरातील सर्व सण – उत्सव पर्यावरणपूरक साजरे करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्या सूचनांचे काटेकोर पालन करुन आपले सण – उत्सव हे निसर्गाला पूरक आणि भूमी, वायू, अग्नि, जल, आकाश या नैसर्गिक पंचतत्वांचे रक्षण व संर्वधन करून साजरे करावयाचे आहेत.

त्या अनुषंगाने यावर्षी २७ ऑगस्ट २०२५ पासून श्रीगणेशोत्सवास प्रारंभ होत असून विघ्नहर्ता श्रीगणरायाचा उत्सव हा प्रदूषणाचे विघ्न दूर करुन पर्यावरणशील रितीने 'इकोफ्रेंडली' साजरा करण्याकरीता प्रत्येकाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. याकरिता खालील बाबींचे पालन करणे अपेक्षित आहे.

श्रीगणेशमूर्ती चिकणमाती, प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी), प्लास्टिक आणि सिमेंट यांसारख्या साहित्यापासून बनवल्या जातात. या मूर्तींना सजवण्यासाठी बरेचदा विषारी रंगांचा वापर केला जातो. जेव्हा या मूर्तींचे विसर्जन केले जाते तेव्हा हे रंग व साहित्य पाण्यात पूर्णपणे विरघळत नाही, परिणामी पर्यावरणाचे प्रदूषण होते. त्याकरिता पर्यावरणपूरक शाडू मातीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात यावी.

गणेशोत्सवातील सजावटीसाठी थर्माकोल शीट्स आणि प्लास्टिक वापरून बनविलेल्या अविघटनशील साहित्याचा पर्यावरणावर दीर्घकालीन प्रतिकूल परिणाम होतो त्यामुळे सजावटीत थर्मोकोल व प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळून कागद, पुठ्ठे आणि कापडाचा वापर करण्यात यावा.

यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या सीबीडी बेलापूर येथील कपडा पुनर्वापर प्रकल्पाच्या ठिकाणी वापरलेल्या कपड्यापासून अत्यंत आकर्षक सजावट साहित्याची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्या कापडी सजावट साहित्याचा वापर करून नागरिक आपली सजावट अत्यंत आगळ्यावेगळ्या पध्दतीने आकर्षक करू शकतात. हे साहित्य नागरिकांना सहजपणे उपलब्ध व्हावे याकरिता नमुंमपा मुख्यालय तसेच आठही विभाग



कार्यालयांमध्ये या साहित्याचे विशेष स्टॉल मांडण्यात आले आहेत. त्याचा नागरिकांनी पर्यावरणपूरक दृष्टीकोन जपत मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा.

उत्सवांमध्ये डीजे, लाऊडस्पिकरमुळे होणारे ध्वनी प्रदूषण हा आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय असून निवासी भागात सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत ५५ डीबी आणि रात्री १० ते मध्यरात्रीपर्यंत ४५ डीबी पेक्षा जास्त आवाज नसावा. तसेच मध्यरात्रीनंतर लाऊडस्पीकरचा वापर करण्यास सक्त मनाई आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने नैसर्गिक जलस्रोतांचे प्रदूषण कमी करण्याकरिता विसर्जनासाठी सर्वच विभागात सार्वजनिक ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था केलेली आहे. नागरिकांनी जलप्रदूषण टाळण्यासाठी श्रीमूर्ती विसर्जनासाठी प्राधान्याने कृत्रिम तलावांचा वापर करावा. सहा फूट उंचीपेक्षा कमी उंचीच्या सर्व श्रीमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावातच करावे.

जलप्रदूषण रोखण्यासाठी महानगरपालिका आठही विभाग कार्यालय क्षेत्रात मैदाने, उद्याने, मोकळ्या जागा, मोठ्या सोसायट्या अशा सार्वजनिक स्वरूपाच्या विविध ठिकाणांवर मोठ्या संख्येने कृत्रिम तलावांची निर्मिती करीत असते. या कृत्रिम तलावातच नागरिकांनी श्रीमूर्ती विसर्जन करावे यादृष्टीने महानगरपालिकेच्या वतीने जनजागृती करण्यात येते.

श्रीमूर्तींचे कृत्रिम तलावातच विसर्जन करावे या जनजागृती कार्यात एक सामाजिक जबाबदारी म्हणून विविध स्वयंसेवी संस्था व पर्यावरणप्रेमी कृतीशील नागरिकांनी पुढाकार घ्यावा आणि विसर्जनाकरिता कृत्रिम तलावांचा वापर करावा हा संदेश सर्वांपर्यंत पोहचविण्यासाठी व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्यासाठी सक्रिय सहभागी व्हावे, असे सर्व संस्थांना आवाहन करण्यात येत आहे.

> **उत्सव कालावधीत नागरिकांनी प्लास्टिकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करावा, सण समारंभामध्ये टाकाऊ वस्तुंचा व पुनर्वापर करण्यायोग्य वस्तुंचा वापर जास्तीतजास्त करावा, फटाक्यांचा वापर टाळावा आणि पर्यावरणपूरक, प्रदूषणमुक्त 'पर्यावरणपूरक श्रीगणेशोत्सव २०२५' साजरा करावा.**
> **–डॉ. कैलास शिंदे,**
> आयुक्त, महापालिका

# उरणमध्ये टीबी फोरम कमिटीची सभा



**उरण : बातमीदार**

पंचायत समिती उरण येथे गटविकास अधिकारी यांच्या दालनामध्ये टीबीमुक्त ग्रामपंचायत अभियानांतर्गत तालुकास्तरीय टीबी फोरम कमिटीची सभा घेण्यात आली.

त्यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र इटकरे, महिला व बाल विकासचे काळे सर, खासगी वैद्यकीय अधिकारी डॉ. साठे सर, प्राथमिक आरोग्य केंद्र गव्हाणचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अब्दुल सर, प्राथमिक आरोग्य केंद्र कोप्रोलीचे वैद्यकीय अधिकारी डॉ.कविता भगत, सर्व सीएचओ, औषध निर्माण अधिकारी थळे, आरोग्य सहाय्यक व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. सभेमध्ये पुढील चार महिन्यांमध्ये टीबी मुक्त ग्रामपंचायतचे सर्व टार्गेट पूर्ण करून घेण्याबाबत तसेच प्रत्येक उपकेंद्र व ग्रामपंचायत अंतर्गत टीबीविषयी जनजागृतीकरिता करावयाच्या बाबींबाबत चर्चा झाली.

उपचारावरील रुग्णांना उपचार पूर्ण करून घेण्याबाबतचे नियोजन, आर्थिक व सामाजिक आधार देण्याबाबत संबंधित ग्रामपंचायत वर जबाबदारी देण्यात आली.

# बीसीटी विधी कॉलेजमध्ये ग्रंथपाल दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) कॉलेज ऑफ लॉ, उपनगरी वेलये येथील ग्रंथालय समितीच्या वतीने राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. भारतीय ग्रंथालय विज्ञानाचे जनक म्हणून ओळखले जाणारे डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला आदरांजली अर्पण करत प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कॉलेजच्या ग्रंथपाल जान्हवी भोईर यांनी उपस्थितांचे स्वागत करत ग्रंथालयाचे शैक्षणिक जीवनातील महत्त्व विशद केले. डॉ. रंगनाथन यांच्या योगदानावर प्रकाश टाकत त्यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा अधिक प्रभावी वापर करण्यासाठी प्रोत्साहित केले. यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सानवी देशमुख व सहायक प्राध्यापिका धनश्री कदम (B.A. LL.B. समन्वयक) यांनी डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्पहार



अर्पण करून त्यांना सामूहिक आदरांजली वाहिली. प्राचार्य डॉ. देशमुख यांनी आपल्या मुख्य भाषणात वाचन सवयींचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना दररोज वाचनासाठी वेळ देण्याचे आवाहन केले.

दररोज किमान एक पान वाचल्यास विद्यार्थ्यांचे ज्ञान, आकलन क्षमता आणि एकूण शैक्षणिक गुणवत्ता नक्कीच सुधारेल, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत ग्रंथालयाच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचा समारोप ग्रंथपाल जान्हवी भोईर यांनी आभार प्रदर्शन करत केला. त्यांनी सर्व मान्यवरांचे आणि उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले.

# एमएनएम विद्यालयाची सिडको अग्निशमन केंद्रास क्षेत्रभेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरु नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांची सिडको अग्निशमन केंद्रास सोमवारी (दि.११) क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली.

या वेळी इयत्ता पाचवीच्या १२३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अकस्मित आग लागल्यास तत्काळ विझवण्यासाठी आग प्रतिबंधक उपकरणांच्या साह्याने तसेच सुरक्षितता वेश परिधान करून अग्निशामक नळकांड्यांचा वापर करून, अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी अग्निशमन करण्याचे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके दाखविली. दरम्यान, अग्निशमन अधिकारी राठोड यांनी विद्यार्थ्यांना, अग्नीचे प्रकार, घरगुती ठिकाणी आग लागल्यास घ्यावयाची काळजी तसेच प्रतिबंधात्मक उपाय याबद्दल सविस्तर माहिती सांगितली. फायर अँड सेफ्टी विभागाच्या अंबरनाथ भोईर यांनी विद्यार्थ्यांना अग्नि सुरक्षा याबाबत प्राथमिक स्वरूपाची काळजी व उपाय याबद्दल मार्गदर्शन केले.

शाळेतील शिक्षिका व विद्यार्थी यांनी अग्निशामन अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाने अग्निशामक नळकांड्यांचा प्रत्यक्ष वापर करून आग विझवण्याचे प्रात्यक्षिक केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी विद्यार्थ्यांना मिळालेल्या अग्निशमन बद्दलच्या माहितीचा उपयोग दैनंदिन व्यवहारामध्ये करावा असे नमूद केले. शाळेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, प्राथमिक विभागाच्या, प्रगती यशवंतराव, सोनाली भोईर, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमात सहभाग नोंदवला.




# तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धेत आध्या शेडगेचे यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धेत केडी आर्ट्स अकॅडमीची विद्यार्थिनी आध्या शेडगे हिने तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

ही स्पर्धा १३ जुलै रोजी झाली असून या स्पर्धेत एकूण नवी मुंबई वरुण १०० अधिक स्पर्धक होते आणि १० ऑगस्ट २०२५ बक्षीस समारंभ आयोजित करण्यात आला होता.आध्या ही चौथी इयत्तेत शिकणारी विद्यार्थीनी असून ती गेल्या दोन वर्षांपासून केडी आर्ट्स अकॅडमी, पनवेलमध्ये चित्रकला शिकत आहे. नियमित वर्गांना उपस्थित राहणे आणि सातत्यपूर्ण सराव यामुळे तिने हे यश संपादन केले आहे. हे यश तिच्या मेहनतीचे आणि चिकाटीचे खरे प्रतिक आहे, असेकेडी आर्ट्स अकॅडमीचे संस्थापक चित्रकार केविन डायस यांनी सांगितले.

# कळंबोलीतून ३७ वर्षीय व्यक्ती बेपत्ता

**कळंबोली :** लोखंड व पोलाद बाजारपेठेमधील प्लॉट नंबर १५१५ मध्ये काम करीत असलेल्या हडताजी पिराजी राजपूत वडियार ३७ वर्षीय व्यक्ती आपल्या भावाकडे काम करीत होता. १ ऑगस्ट २०२५ रोजी नाश्ता करून येतो असे सांगून तो निघून गेला ते आजपर्यंत परतला नसल्याने तो हरवल्याची तक्रार कळंबोली पोलिसांत करण्यात आली. बेपत्ता युवकांनी काळी पॅन्ट व पांढरा शर्ट घातला असून पायात स्लीपर आहे. त्याची अंदाजे उंची पाच फूट नऊ इंच असून त्याला हिंदी, मराठी व गुजराती भाषा अवगत आहेत. कोणास माहिती मिळाल्यास कळंबोली पोलिसांशी संपर्काचे आवाहन करण्यात आले आहे.



**पनवेल : भाजप वावंजे जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश खैरे यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील, धनाजी म्हात्रे, मयुर खैरे, योगेश पाटील आदी उपस्थित होते.**

राम प्रहर

## श्रावणधारा

### सौंदर्य...!

आरशाला पाहता
लागले स्व शोधात
खरंच मी इतकी सुंदर
होते का? पडले भ्रमात
केस होते काळेभोर
होती वेणी सुडौल
गजरा वेणिस माळता
सोबत एक गुलाब फूल
काळे काजळ डोळ्यात
आकार धनुष्य बाणात
गाली लाजेची लाली
पावडरचा थोडा वर हात
अंगरभर कपड्यात
सौंदर्य नितळ खुलते
ओढणी अशी सरकता
नकळत कशी सावरते
अशा साध्या सौंदर्यात
सख्याची अपार प्रीत
जन्मोजन्मीच्या बंधनात
आजही राही विश्वासात
आरशाने आज कांहीं
सांगितले हो मजला
प्रीत कधी लाचार नाही
मेकअपच्या भपक्याला
दोन मनाची निर्मळता
पाहता एकरुप होते
अंतरंगातील प्रितीची
सिग्नल अशी वाजते..!



–प्रा. अर्चना कुलकर्णी,
अंबेजोगाई, जि.बीड

# रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये ग्रंथपाल दिन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि.१२) ग्रंथालय समितीच्या वतीने राष्ट्रीय ग्रंथपाल दिवस साजरा केला.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी ग्रंथालय आणि ग्रंथालयशास्त्र शिक्षणाची गरज संपूर्ण जगाला करून देणारे भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये ग्रंथालयशास्त्राद्वारे ग्रंथालयाचे पावित्र्य आणि महत्त्व वाढविणारे 'फाइव्ह लॉज ऑफ लायब्ररी सायन्स'हे पुस्तक म्हणजे ग्रंथालयशास्त्राचा पाया समजला जातो तसेच शिक्षणातील योगदान स्पष्ट केले आणि विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा अधिकाधिक उपयोग करावा असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये वाचकवृत्ती वाढवणे, ग्रंथालयाच्या महत्त्वाची जाणीव करून देणे आणि ज्ञानाच्या क्षेत्रात अधिक सक्रीय सहभाग प्रोत्साहन देणे हे होते. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून डॉ एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले.

या कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथपाल समाधान बेहेरे यांनी केले तसेच त्यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे जीवन आणि कार्य याविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.



# करंजाडे येथे दुर्गामाता मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा

## मंत्री गोगावले यांनी घेतले दर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे येथे प.पू. गगनगिरी महाराज व स्व. सदाशिव तुकाराम साबळे यांच्या आशीर्वादाने ८ ऑगस्ट ते १० ऑगस्ट श्री दुर्गामाता मंदिराचा जिर्णोद्धार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी गगनगिरी महाराजांचे शिष्य गणेशगिरी महाराज यांच्या हस्ते देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या वेळी मंत्री भरतशेठ गोगावले यांनी उपस्थिती दर्शवत दुर्गा मातेचे मनोभावे दर्शन घेतले.

करंजाडे येथे स्व.सदाशिव साबळे यांनी प.पू.गगनगिरी महाराज यांच्या आशिर्वादाने दुर्गा मातेचे मंदिर सन २००० साली उभारले. या मंदिराला २५ वर्षे पूर्ण झाली. त्यामुळे हे मंदिर जीर्ण झाले होते. त्यामुळे



साबळे परिवाराने या मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचे ठरवले. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. ८ ऑगस्ट २०२५ रोजी गणेश पूजन, पुण्याह वाचन ई. नामस्मरणाने या कार्यक्रमाची सुरूवात झाली. ९ ऑगस्टला होम हवन करण्यात आले. सायंकाळी देवीची दिंडी सोहळा मिरवणूक काढण्यात आली. गावदेवी भजनी भारूड मंडळाचे दिंडी भजन होणार आहे तर रात्री दत्त प्रासादिक भजन मंडळाचे संगीत भजन आयोजित करण्यात आले. रविवार १० ऑगस्ट रोजी कलशारोहण व प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

या सोहळ्यात असंख्य भावीक, मंत्री भरत गोगावले आमदार विक्रांत पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे आदींनी मनोभावे दर्शन घेतले.

# वीजपुरवठा सुरळीत करा

## आमदार महेश बालदींची अधिकाऱ्यांना सक्त सूचना

**चौक : प्रतिनिधी**

येत्या काळात वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास संबंधित अधिकारी यांना दोषी ठरवून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी वीज वितरण कंपनी यांच्या वरिष्ठ अधिकारी यांच्याशी चर्चा करून दोषी अधिकारी यांना घरी पाठविण्यात येईल, असे स्पष्ट मत उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांनी व्यक्त केले आहे, त्यामुळे अधिकारी यांच्यात चलबिचल सुरू झाली आहे.

चौक, वासंबे, वडगांव वाशिवली, मोहोपाडा परिसरातील विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत आहे. दिवसाला पाच तास वीज पुरवठा खंडित असतो. पहाटे आणि सकाळी ठराविक वाजता वीज पुरवठा खंडित होतो, ट्रान्सफॉर्मर वेळेवर न उपलब्ध होणे, कर्मचाऱ्यांचा तुटवडा, भ्रमणध्वनी न घेणे, कार्यालयात कर्मचारी यांची उपस्थिती नसणे, आदिवासी भागात दुर्लक्ष होणे, रेल्वे कामामुळे वीज पुरवठा तुटणे, त्यावर त्यांचे दुर्लक्ष होणे आणि त्यांच्यावर कारवाई न करणे, जनता आणि स्थानिक लोक प्रतिनिधी, सामाजिक



कार्यकर्ते यांच्या पत्राला उत्तर न देणे अशा अनेक समस्या गेल्या काही महिन्यांपासून या परिसरात उद्भवत आहेत, त्यासाठी स्थानिक पातळीवर पाठपुरावा होत आहे. चौक वीज पुरवठा कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला, पण यात काहीही सुधारणा न झाल्याने उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांनी अधीक्षक अभियंता पेण व संबंधित अधिकारी यांच्या बैठक चौक येथे जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे यांच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती.

या वेळी आमदार महेश बालदी यांनी आपल्या कामात सुधारणा करा; अन्यथा वरिष्ठ अधिकारी यांच्याशी संपर्क साधून आपल्यावर कारवाई करण्याचे निर्देश दिले जातील, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे अधिकारी आणि कर्मचारी धास्तावले आहेत. भाजपचे उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, तालुका मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, विभागीय अध्यक्ष सचिन तांडेल, जगू हातमोडे, अनंत ठोंबरे, महेश पाटील, बाळू शिर्के, वसंत पाटील, चौक शहर अध्यक्ष गणेश कदम, व्यापारी असोसिएशन अध्यक्ष हर्षल हनुमंते, सरपंच नितीन तवले, पिंट्या राणे व परिसरातील अन्य सामाजिक कार्यकर्ते यांनी आपल्या परिसरातील वीजपुरवठा खंडित होणाऱ्या समस्या मांडल्या.

पनवेल-कर्जत रेल्वे मार्गाचे काम होताना अनेक वेळा त्यांच्याकडून वीजपुरवठा करणाऱ्या वाहिनी तोडण्यात आल्या, पण त्यांच्यावर कारवाई करण्यात येत नसून उलट आमच्यावर रेल्वे कडून गुन्हे दाखल करण्यात येत असल्याचे उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांनी सांगितले. तर काटवण सारख्या दुर्गम आदिवासी भागात आठ दिवस ट्रान्स्फर मिळत नसल्याने आदिवासी बांधव यांच्यात संतापाची भावना निर्माण झाली असल्याचे मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे यांनी सांगितले.

सर्व प्रथम आमदार महेश बालदी यांनी वीजपुरवठा अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या समस्या, कामात येणाऱ्या अडचणी समजून घेतल्या, आणि काही समस्या, तांत्रिक बाबी यांचीही चर्चा केली. या वेळी अधीक्षक अभियंता धनराज बीळकड यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड यांच्याकडून (एमएसईडीसीएल) कडून वीज ग्राहकांना नवीन वीज जोडण्यांची तत्काळ उपलब्धता, नवीन सेवा जोडणी (एनएससी) योजनेअंतर्गत, पायाभूत सुविधांच्या बांधकामाचा आढावा, नवीन वीज जोडणीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे, वेळेत सेवा प्रदान करण्याबाबत माहिती दिली.

निरंतर वीज योजनेबाबत माहिती देताना वीज वितरण प्रणाली सुधारणे आणि लोकांना अखंड वीजपुरवठा उपलब्ध करून देणे साठी १५ वर्ष, जुने आणि सदोष रोहित्रे (ट्रान्सफॉर्मर) बदलून नवीन आणि अधिक कार्यक्षम रोहित्रे बसवण्यात येणार असल्याची माहिती दिली आहेत. RDSS योजनेबाबत वितरण प्रणालीत सुधारणा करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात येणार असल्याची माहिती दिली. गणपती पूर्वी सर्व कामे पूर्ण होतील, असे आश्वासन देऊन मे महिन्यात पडलेल्या अवकाळी पावसाने आम्हाला पावसाळ्यापूर्वीची कामे करता न आल्याचे सांगून दिलगिरी व्यक्त केली.

कार्यकारी अभियंता पनवेल ग्रामीण विद्याधर शिंदे, उप कार्यकारी अभियंता महादेव मुंडे, उप कार्यकारी अभियंता रविकिरण पाटील, सहाय्यक अभियंता योगेश देसाई, लक्ष्मीकांत गलांडे, प्रवीण शेडगे उपस्थित होते. या आश्वासनांचा आढावा घेण्यासाठी २ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्य कार्यकारी अभियंता यांच्या बरोबर बैठक होईल, जे अधिकारी अकार्यक्षम ठरतील त्यांनी घरचा रस्ता दाखवला जाईल, असे सांगितले.

# मुरूड नगर परिषदेतर्फे व्हॉट्सॲप चॅटबॉटचे लोकार्पण

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगर परिषदेचा लोकाभिमुख डिजिटल उपक्रम- व्हॉट्सॲप चॅट बॉटचे लोकार्पण मुरूड अलिबाग विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते मुरूड जंजिरा नगर परिषद प्रशासकीय कार्यालयात करण्यात आले.

या वेळी प्रशासक तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव, प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर, कर निर्धारण अधिकारी अनिकेत जगदाळे, शहर अभियंता अनिकेत वाजे, लेखपाल कपिल वेहेले, माजी नगराध्यक्षा स्नेहा पाटील, महिला शिवसेना जिल्हा संघटिका तृप्ती पाटील, मुरूड शहर प्रमुख संदीप पाटील, आशिलकुमार ठाकूर, शिवसेना मरूड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, सागर चौलकर, जयकृष्ण भिसे, युगा ठाकूर, शिवसेना मुरूड तालुका संघटक यशवंत पाटील, शिवसेना बांधकाम समिती अध्यक्ष दिनेश मिनमीने, माजी नगरसेवक पांडुरंग आरेकर, सुपारी संघाचे चेअरमन अविनाश दांडेकर,



किशोर धामणस्कर, महेश पाटील आदी उपस्थित होते.

या वेळी प्रशासक तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, मुरूड जंजिरा नगर परिषद नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि सुलभ प्रशासन राबविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत नगर परिषदेचा 'व्हॉट्सॲप चॅट बॉट' अधिकृतपणे सुरू करण्यात आला आहे. या अत्याधुनिक डिजिटल सेवेमुळे नागरिकांना घरबसल्या अनेक महत्त्वाच्या सेवांचा लाभ मिळणार आहे.

डिजिटल माध्यमातून, पारदर्शक आणि जलद सेवा देण्याचा आमचा प्रयत्न नागरिकांच्या सहकार्याने अधिक यशस्वी होईल. तंत्रज्ञानाचा वापर करून मुरूड-जंजिरा नगर परिषद प्रशासन अधिक लोकाभिमुख बनविण्यासाठी नागरिकांनी या प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन मुरूड जंजिरा नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी-सचिन बच्छाव यांनी केले. या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करून जनतेसाठी केलेल्या उपक्रमाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

# सहकारी पतसंस्थेतर्फे गुणवंतांचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड येथील जयश्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेच्या ३१व्या वार्षिक सर्व साधारण सभेत मुरूड तालुक्यातील दहावी व बारावीत सर्वप्रथम उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा व सदस्यांच्या पाल्यांचा प्रशस्तीपत्रे व रोख रक्कम देऊन पतसंस्थेचे चेअरमन दिलीप जोशी व संचालकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

गुणवंतांमध्ये स्वरा सोमप्रकाश राउळ, अश्मल अनुल किल्लेदार, विया अजय जैन, रागिणी नारायण पावशे, उर्वशी दिनेश कोवळेकर, अंतरा कैलास नाक्ती, श्रुती सुहास म्हात्रे, महेक नकुल शर्मा, नियती निलेश पाटील, अनिह भालचंद्र जोशी, वेदिका संतोष खोत, तनिष रविंद्र मुंबईकर, जयवंत नरेश रोटकर, स्वरांग उदय खोत, अक्षरा मंगेश शेळके, मुग्धा चंद्रकांत नांदगावकर, प्रिती कैलास म्हात्रे, सानिया महेंद्र भोईर, निष्णाई रूपेश तळेकर आदींचा समावेश होता.

सभेत प्रा.एस. बी. वाटाणे यांनी पतसंस्थेच्या सदस्यांची हक्क आणि कर्तव्ये या विषयी माहिती देताना सभासदांनी क्रियाशिल होऊन किमान एक हजाराचे तरी भाग खरेदी करावेत तसेच के वाय सी प्रकिया पुर्ण करण्याचे आवाहन केले. प्रास्ताविकात चेअरमन दिलीप जोशी यांनी पतसंस्थेकडे भाग भांडवल तीन कोटी २६ लाख रुपये असुन ५४ कोटींहून अधिक ठेवी असल्याचे स्पष्ट करत ७२ लाख नफा प्राप्त केला, असे सांगितले. मोहन तांबडकर, बाळकृष्ण कासार, सुनील विरकुड, डॉ. संजय पाटील, डॉ. अमित बेनकर, प्रमोद उपाध्ये, समीर उपाध्ये, अशोक दिवेकर, जयश्री जोशी, अश्विनी पाटील, संजय ठाकूर आदी उपस्थित होते.




# सुवर्णा जाधव यांची नियुक्ती

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र मराठी सामाजिक संघ या सेवाभावी संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी माणगाव येथील समाजसेविका सुवर्णा जाधव यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना तशा आशयाचे नियुक्तीपत्र संघटना प्रमुख दिपक काळिंगण यांनी आपल्या सहीनिशी दिले आहे. सुवर्णा जाधव यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



माणगाव येथील समाजसेविका सुवर्णा जाधव या बहुजन समाजात सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून काम करीत असतात. त्यांना समाज कार्याची विशेष आवड आहे. माणगाव तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम त्या सातत्याने राबवित असतात. महिला सक्षमीकरणासाठी त्यांची विशेष अशी तळमळ नेहमीच राहिली आहे. महिलांच्या हाताला काम मिळून त्यातून मिळणाऱ्या चार पैशांतून त्यांच्या कुटुंबाला हातभार लागावा तसेच महिलांनाही आपल्या आवडी - निवडीप्रमाणे काही मौल्यवान वस्तू खरेदी करता याव्यात हा उदात्त हेतू नजरेसमोर ठेऊन सुवर्णा जाधव या महिलांच्या उन्नतीसाठी काम करीत असतात.

# पेणच्या गणेशमूर्ती रेवदंड्यात दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अवघ्या महाराष्ट्रासह देश विदेशात पेण मधील श्री गणेश मुर्तीना विशेष मागणी आहे, रेवदंडा पंचक्रोशीत सुध्दा पेण येथील श्री गणेश मुर्तीची मागणी श्री गणेशत्सौवाचे निमित्ताने होत असल्याने शहरात अनेक ठिकाणी पेणच्या श्री गणेश मुर्ती विक्रीस ठेवण्यात आल्या आहेत.

रेवदंडा शहरात श्री स्वामी समर्थ या केसरीनाथ वडके यांचे दुकानात पेण मधील एक फुटी ते पाच फुटी उंचीच्या विविध आकारातील आकर्षक कलाकुसर व वैशिष्टपुर्ण मुर्ती प्रतिवर्षाप्रमाणे विक्रीस आणल्या आहेत. यामध्ये कोळी समाजासाठी खास आकर्षण असलेले कोळी बांधव व एकविरा मातेची नाविन्यपुर्ण मुर्ती लक्ष्य वेधून घेत आहे. यामध्ये श्री गणेश भक्ताच्या मागणीनुसार श्री गणेश भक्ताच्या मागणीनुसार माती व प्लष्टर ऑफ पॅरीस बनावटीच्या मुर्ती उपलब्ध आहेत. श्री गणेश उत्सव नजीक आल्याने श्री गणेश भक्त श्री गणेश मुर्ती पसंती करून ॲडव्हान्स खरेदी बुकींग करत आहेत. यावर्षी श्री गणेश मुर्तीच्या किमंतीत पंचवीस टक्के वाढ झाली असून सोबत वाहतुक खर्चात सुध्दा वाढ झाली आहे. त्यामुळे श्री गणेश मुर्तीच्या किमेंतीत सुध्दा नाईलाजास्तव वाढ करावी लागते असे श्री स्वामी समर्थ दुकानाचे मालक केसरीनाथ वडके यांनी म्हटले.

श्री गणेश मुर्तीची किमंतीत वाढ झाली असली तरीही रेवदंडा पंचक्रोशीतील गावागावातून श्री गणेश भक्तानी मुर्तीची मागणी केली असून येत्या श्री गणेशौत्सा पुर्वी श्री गणेश मुर्ती आपआपल्या घरी घेऊन जाणार आहेत. श्री स्वामी समर्थ श्री गणेश मुर्ती विक्रेते दुकानदार यांनी म्हटले.

# तांबाटी येथे अंगणवाडीचे उद्घाटन

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात तांबाटी ग्रामपंचायत हद्दीत गोदरेज एंटरप्राइझेस ग्रुपने ग्रामपंचायत आणि एकात्मिक बाल विकास सेवा (आयसीडीएस) यांच्यासोबत सहयोगाने तांबाटी येथे लहाणग्यांना शैक्षणिक वाटचालीची आवड निर्माण व्हावी व भावी पिढी घडावी यासाठी गोदरेज कंपनीच्या सामाजिक दायित्व फंडातून मुलांना मनोरंजनासाठी उपयुक्त असणारे शैक्षणिक खेळणी असणाऱ्या अंगणवाडीचे उद्घाटन केले.



या अंगणवाडीमध्ये तांबाटी व परिसरातील गावांमधील स्थानिक आदिवासी समुदायांसह सहा वर्षांखालील मुलांना सुरक्षित, सर्वसमावेशक आणि सुसज्ज वातावरण प्रदान करण्यासाठी हे केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्राचा दरवर्षी जवळपास पाच मुले, ३० गरोदर महिला, ५० हून अधिक स्तनपान करणाऱ्या माता आणि जवळपास १०० कुटुंबांना फायदा होणार आहे.

या अंगणवाडीचे उद्घाटन खालापूरचे नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी मुलांसोबत फित कापली आणि मुलांमध्ये उज्वल भविष्य घडवण्याप्रती आशेचा किरण जागृत केला. या वेळी गोदरेज एंटरप्रायझेस ग्रुपच्या सीएसआर अँड सस्टेनेबिलिटी रिपोर्टिंग प्रमुख अश्विनी देवदेशमुख तांबाटीचे सरपंच अविनाश आमले खालापुर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या उपस्थितीत नामफलकाचे अनावरण केले.

या वेळी गोदरेज कंपनीचे राजेंद्र पाशीलकर, रमेश भांडारकर, तानाजी चव्हाण ग्रामपंचायत सदस्य हरिभाऊ जाधव, संतोष दळवी, अरुणा सावंत, सुगंधा जाधव, ग्रामसेवक प्रशांत कदम यासह अन्य मान्यवर ग्रामस्थ पालक वर्ग उपस्थित होते. या उद्घाटनानंतर शाश्वततेला प्रोत्साहन देण्यासाठी अंगणवाडीच्या परसबागेत वृक्षारोपणदेखील करण्यात आले.

# सोफिया शाळेकडून पोलीस बांधवांना राख्या

**खोपोली : प्रतिनिधी**

शालोम एज्युकेशन सेंटर संचालित सोफिया दिव्यांग मुलांची शाळा. या शाळेतील विद्यार्थ्यांनी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी खोपोली पोलीस ठाण्याला जाऊन सर्व पोलीस बांधवांना राख्या बांधल्या. या कार्यक्रमांमध्ये पोलीस निरीक्षक सचिन हिरे, पोलीस उपनिरीक्षक पूजा चव्हाण आणि गोपनीय अंमलदार संतोष रुपनवर यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.



शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या बांधून राखी पौर्णिमा साजरी करण्यात आली या कार्यक्रमांमध्ये पोलीस स्टेशन कडून विद्यार्थ्यांना खाऊ वाटप व भेटवस्तू देण्यात आल्या. शालोम एज्युकेशन सेंटरचे संचालक मोहनदास मजेठीया उपाध्यक्ष रूपा मजेठिया व विश्वस्त जिनी सॅम्युअल मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका शुभा पाटणकर विशेष शिक्षिका साक्षी पवार सहाय्यक शिक्षिका मंजू बोडके कला शिक्षिका जयंती सोलंकी कॉम्प्युटर शिक्षिका शरयू कोरे व योगशिक्षिका एडवोकेट विद्या डोंगरे मॅडम सर्व विद्यार्थी व पालक यांच्या समवेत राखी पौर्णिमेचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी शाळेला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले कार्यक्रम झाल्यानंतर सचिन घरत यांनी खोपोली पोलीस स्टेशनची कार्यपद्धती मुलांना दाखवली. यामध्ये वायरलेस सिस्टीम सीसीटीव्ही सिस्टीम शस्त्रागार जेल यासारख्या गोष्टी दाखवल्या विद्यार्थी खूप उत्साही होते त्यांनी अनेक प्रश्न विचारले व माहिती करून घेतली.

# 'रमाईचं कुंकू' गीतसंग्रहाचे प्रकाशन

**पाली : प्रतिनिधी**

आंबेडकरी विचारधारेचा पाईक असलेल्या कवी बाळकृष्ण उर्फ बाळराज पवार यांच्या रमाईचं कुंकू या गीत संग्रहाचे प्रकाशन नुकतेच पार पडले. या गीत संग्रहात तरुणांना प्रेरणा देणाऱ्या आणि आंबेडकरी विचारांचा वारसा सांगणाऱ्या गीतांचा समावेश आहे.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला दिलेले विचारधन आणि त्यासाठी रमाई यांचे योगदान यांचा या गीत संग्रहात विशेष उल्लेख आहे. आयुष्यभर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर चालणाऱ्या आणि त्यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी आपल्या लेखन कार्यातून कार्यरत राहणारे सेवा निवृत्त मुख्याध्यापक आणि कवी बाळकृष्ण पवार हे रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील वरवेली गावचे सुपुत्र आहेत. शिक्षक म्हणून विविध शाळांमध्ये काम केलेल्या बाळकृष्ण पवार यांनी स्वेच्छा निवृत्तीनंतर पूर्णवेळ लेखन कार्याला वाहून घेतले आहे.

बौद्ध विकास मंडळ, वरवेली यांचे माजी अध्यक्ष, तसेच सम्यक कोकणकला संस्था, गुहागर यांचे सक्रिय पदाधिकारी म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. त्यांच्या रमाईचं कुंकू या पहिल्याच गीत संग्रहाचे प्रकाशन जग बदलणारा बाप माणूस या पुस्तकाचे लेखक व प्रसिद्ध व्याख्याते जगदीश ओहोळ, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त कवी लेखक राष्ट्रपाल सावंत व इतर मान्यवरांच्या हस्ते पाटपन्हाळे गुहागर येथे नुकतेच पार पडले. या वेळी समाजातील विविध स्तरातील मान्यवर आणि प्रतिष्ठित आवर्जून उपस्थित होते.

# 'तणावविरहीत जीवनशैलीतून मधूमेहमुक्ती साध्य'

**अलिबाग : प्रतिनिधी**

व्यायाम, आहारात योग्य बदल आणि मानसिक तणावविरहीत जीवनशैलीच्या अंगीकरणाने मधुमेहापासून हमखास मुक्तता मिळूशकते, असे प्रतिपादन पुणे येथील डायबेटीस फ्री फॉरेएव्हरचे संचालक डॉ. भाग्येश कुलकर्णी यांनी केले.




रविवारी (दि.१०) कमळ नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे डॉ. अरविंद केळकर यांच्या सहकार्याने अलिबाग येथील भाग्यलक्ष्मी सभागृहात मधुमेह मुक्त जीवन कसे ते जाणून घेऊ या विषयावरील कार्यक्रमात ते बोलत होते. कमळ नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके डॉ. संजीव शेटकर, डॉ. अमेय केळकर, विलास म्हात्रे, डॉ. अरविंद केळकर, डॉ. अपुर्वा कुमठेकर व डॉ. अवनी केळकर आदी उपस्थित होते.

डॉ. भाग्येश कुलकर्णी म्हणाले की, मधुमेह वाढीसाठी दोन गोष्टी या कारणीभूत ठरत आहेत. यातील एक चरबी वाढणे व जीवनामध्ये तणाव. रोज ४५ मिनिटे व्यायाम, सूर्यनमस्कार व शरीरामधून घाम आला पाहिजे, त्यामुळे आपल्या मधुमेह कमी होण्यास मदत होते. व्ययामानंतर एक दीड तास काही न खाणे व मोड आलेले कडधान्य, रस व वेळेवर झोपणे, मन शांत ठेवणे व तणाव मुक्त जीवन जगणे यातून मधुमेह कमी होण्यास मदत होते.

या वेळी डॉ. अरविंद केळकर यांनीदेखील मनोगत व्यक्त केले. आभार कमला पतसंस्थेचे वरिष्ठ व्यवस्थापक दिलीप पाटील यांनी मानले. कार्यक्रमाची सांगत पसायदाने करण्यात आली.

# आशिया चषकासाठी लवकरच संघ निवड

## टीम इंडियात स्थान मिळण्यासाठी खेळाडूंमध्ये चुरस

**मुंबई : प्रतिनिधी**

संयुक्त अरब अमिरातमध्ये होणाऱ्या आगामी आशिया चषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा पुढील आठवड्यात मुंबईत होण्याची दाट शक्यता आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची (बीसीसीआय) निवड समिती मुंबईत बैठक घेणार असून मुख्य खेळाडूंच्या फिटनेस अहवालावरच अंतिम संघ निवड अवलंबून असणार आहे.



९ ते २८ सप्टेंबरदरम्यान होणाऱ्या या टी-२० स्वरूपाच्या स्पर्धेसाठी अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या फिटनेस चाचणी देत आहे. त्याच्या अहवालानंतरच निवडीवर शिक्कामोर्तब होईल.

दुसरीकडे स्पोर्ट्स हर्नियाच्या शस्त्रक्रियेनंतर पुनरागमन करत असलेला कर्णधार सूर्यकुमार यादव सरावाला लागला असून तो स्पर्धेपूर्वी पूर्णपणे तंदुरूस्त होण्याची अपेक्षा आहे. तोच संघाचे नेतृत्व करताना दिसेल, असेही बोलले जाते.

इंग्लंड दौऱ्यातील चमकदार कामगिरीनंतर शुभमन गिलच्या नावाची उपकर्णधारपदासाठी चर्चा सुरू आहे. सध्याच्या घडीला सूर्यकुमारच्या नेतृत्वाखालील संघात अक्षर पटेलकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी आहे. गिल त्याची जागा घेणार असल्याची चर्चा आहे.

अभिषेक शर्मा हा आयसीसीच्या टी-२० क्रमवारीत अव्वलस्थानी आहे. आशिया कप स्पर्धेसाठी त्याचे संघातील स्थान पक्के मानले जात आहे. याशिवाय संजू सॅमसन, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा आणि हार्दिक पांड्या यांच्या फलंदाजीची प्रमुख मदार असेल. सॅमसन हा विकेट किपर बॅटरच्या रुपात पहिली पसंती असेल. दुसऱ्या विकेट किपरच्या रुपात जितेश शर्मा अन् ध्रुव जुरेल यांच्यात टक्कर असेल. शिवम दुबेसह अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर अष्टपैलू खेळाडूंच्या रुपात संघात दिसू शकतात.

### सर्व पर्याय खुले

अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील बीसीसीआय निवड समिती १९ किंवा २० ऑगस्ट रोजी भारतीय संघाची घोषणा करू शकते. सेंटर ऑफ एक्सीलेंसच्या स्पोर्ट्स सायन्स टीमकडून खेळाडूंसंदर्भातील फिटनेस अहवाल आल्यावर भारतीय संघ निवडीचा मार्ग मोकळा होईल. बीसीसीआयच्या एका वरिष्ठ सूत्रांनी नाव न जाहीर करण्याच्या अटीवर पीटीआयला दिलेल्या माहितीत म्हटले आहे की, निवड समितीने सर्व पर्याय खुले ठेवले आहेत.

## आयसीसी प्लेअर ऑफ द मंथ पुरस्कारावर गिलची चौथ्यांदा मोहोर

**नवी दिल्ली :** भारताचा कसोटी कर्णधार शुबमन गिल याची जुलै महिन्यासाठी आयसीसी 'पुरुष प्लेअर ऑफ द मंथ' म्हणून निवड करण्यात आली आहे. गिलने इंग्लंडमध्ये जुलै महिन्यात खेळल्या गेलेल्या तीन कसोटी सामन्यांमध्ये ९४.५०च्या प्रभावी सरासरीने ५६७ धावा फटकावल्या होत्या. हा प्रतिष्ठित पुरस्कार तब्बल चौथ्यांदा जिंकणारा तो पहिला पुरुष खेळाडू ठरला आहे. यापूर्वी गिलला जानेवारी २०२३, सप्टेंबर २०२३ आणि फेब्रुवारी २०२५मध्ये या पुरस्काराने गौरविण्यात आले होते. महिलांमध्ये ॲश गार्डनर आणि हेली मॅथ्यूज यांनी प्रत्येकी चार वेळा हा पुरस्कार जिंकला आहे.

## कुस्तीगीर खाशाबा जाधव पारंपरिक क्रीडा महाकुंभाचा आज प्रारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या पुण्यतिथीनिमित्त कुस्तीगीर खाशाबा जाधव पारंपरिक क्रीडा महाकुंभ २०२५चे आयोजन कुर्ला येथील क्रीडा संकुलात करण्यात आले आहे. पारंपरिक खेळांचे जतन व प्रसार करणाऱ्या या महाकुंभाचे उद्घाटन १३ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून कौशल्य विकास विभाग आणि क्रीडाभारती यांच्या संयुक्त विद्यमाने १३ ते २२ ऑगस्टदरम्यान हा महाकुंभ होणार आहे. क्रीडा व युवक कल्याणमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवणार असून खाशाबा जाधव यांचे पुत्र रणजीत खाशाबा जाधव यांची विशेष उपस्थिती असेल.




## वर्ल्ड स्कूल व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी मुंबई विभागीय निवड चाचणी आज नेरूळमध्ये

**मुंबई : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय शालेय खेळ महासंघ (आयएसएफ) आयोजित वर्ल्ड स्कूल व्हॉलीबॉल (अंडर-१५ बॉईज व गर्ल्स) चॅम्पियनशिप ४ ते १३ डिसेंबरदरम्यान चीनमधील शांग्लूओ येथे होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी राज्यस्तरावरील निवडीसाठी मुंबई विभागीय निवड चाचणी १३ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता नवी मुंबईतील नेरूळ जिमखाना येथे होणार असल्याची माहिती मुंबई विभागाचे क्रीडा व युवक सेवा उपसंचालक यांनी दिली.

चीनमध्ये होणाऱ्या स्पर्धेत सहभागासाठी भारतीय संघाच्या निवडीसाठी राष्ट्रीय पातळीवरील निवड चाचणी २५ ते ३० ऑगस्ट या कालावधीत पुण्यातील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, महाळुंगे-बालेवाडी येथे घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई विभागासाठी निवड चाचणी नेरूळ जिमखाना येथे आयोजित करण्यात आली आहे.

मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड व पालघर जिल्ह्यांतील १५ वर्षांखालील पात्र मुले व मुली या चाचणीत सहभागी होऊ शकतील. या निवडीतून विभागातील सर्वोत्तम पाच मुले व पाच मुली यांची निवड राज्यस्तरासाठी केली जाईल. यासाठी खेळाडूचा जन्म १ जानेवारी २०१०नंतर आणि १ जानेवारी २०१४पूर्वी झालेला असावा तसेच इंग्रजीतील मूळ जन्म दाखला अनिवार्य असणार आहे.

राष्ट्रीय चाचणीवेळी किमान सहा महिन्यांची वैधता असलेला भारतीय पासपोर्ट, विभागीय चाचणीवेळी पासपोर्ट अर्जाचा पुरावा, आधार कार्ड आणि पहिल्या इयत्तेच्या प्रवेशाची शाळेच्या जनरल रजिस्टरमधील नोंदणीची सत्यप्रत आवश्यक आहे. भोजन व्यवस्था खेळाडू किंवा संबंधित शाळेने स्वतः करावी, असेही विभागीय उपसंचालक कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## फेडरर खेळणार प्रदर्शनीय सामना

**शांघाय : वृत्तसंस्था**

टेनिसचा बादशाह आणि २० वेळचा ग्रँडस्लॅम विजेता रॉजर फेडरर निवृत्तीच्या जवळपास तीन वर्षांनंतर पुन्हा एकदा टेनिस कोर्टवर परतणार आहे. फेडररने स्वतः या वृत्ताला दुजोरा दिला असून तो २०२५मध्ये होणाऱ्या शांघाय मास्टर्स स्पर्धेत एका खास प्रदर्शनीय सामन्यात खेळताना दिसेल.



येत्या १० ऑक्टोबर रोजी शांघायमधील प्रसिद्ध क्झिझाँग स्टेडियमवर 'रॉजर अँड फ्रेंडस्' हा सेलिब्रिटी डबल्स सामना आयोजित करण्यात आला आहे. या सामन्यात फेडररसोबत प्रसिद्ध अभिनेता वू लेई, मार्शल आर्टस् स्टार डॉनी येन आणि चीनची माजी दुहेरी ग्रँडस्लॅम विजेती झेंग जी हेही सहभागी होणार आहेत.




## साउथ दिल्लीचा न्यू दिल्ली टायगर्सवर थरारक विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली प्रीमियर लीग २०२५च्या हंगामातील १८व्या सामन्यात अखेरच्या षटकापर्यंत रंगत पहायला मिळाली. पहिल्या तीन चेंडूत एका संघाच्या बाजूने फिरलेला सामना पुढच्या तीन चेंडूत दुसऱ्या संघाने जिंकल्याचे पहायला मिळाले. ज्या गोलंदाजाने या षटकात हॅट्ट्रिक घेतली तोच गोलंदाज संघासाठी खलनायक ठरला.

न्यू दिल्ली टायगर्स संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात नऊ विकेट्सच्या मोबदल्यात धावफलकावर १९६ धावा लावल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना साउथ दिल्ली संघ न्यू दिल्लीचा फिरकीपटू राहुल चौधरीमुळे अडचणीत आला. अखेरच्या षटकात त्याने पहिल्या तीन चेंडूवर तीन विकेट्स घेत हॅट्ट्रिकचा डाव साधला, पण पुढच्या तीन चेंडूत त्याने १२ धावा दिल्या अन् त्याची हॅट्ट्रिक वाया गेली.

अखेरच्या षटकात सहा विकेट्स हातात असताना साउद दिल्लीच्या संघाला १२ धावांची गरज होती. राहुल गोलंदाजीला आला अन् त्याने पहिल्याच चेंडूवर सेट झालेल्या अनमोल शर्माला तंबूचा रस्ता दाखवला. पुढच्या दोन चेंडूवर सुमित माथुर आणि गुलजार संधू यांना बाद करत राहुल चौधरीने हॅट्ट्रिक पूर्ण केली. हॅट्ट्रिक घेतल्यावर राहुलने चौथ्या चेंडूवर वाइडच्या रूपात अवांतर धावांच्या रूपात एक चौकार दिला.

अखेरच्या तीन चेंडूत सात धावांची गरज असताना अभिषक खंडेलवाल याने दोन धावा घेतल्या. दोन चेंडूत पाच धावांची गरज असताना षटकार मारत त्याने मॅच संपवली.


लोकनेते मा. खासदार श्री रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आयोजित

रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा

७५ लोकनेते श्री रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव

भजन परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी भजन स्पर्धेचे आयोजन!
रायगडमधील सर्व भजनी मंडळांनी या उपक्रमात सहभागी व्हावे!

शनिवार दिनांक २३ ऑगस्ट २०२५ आणि रविवार दिनांक २४ ऑगस्ट २०२५.
वेळ - सकाळी ९.०० ते सायं. ७.००
स्थळ - श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हॉल. प्लॉट नं. ४७५. मार्केट यार्ड.पनवेल.

प्रवेश अर्ज

१) भजन मंडळाचे नाव ____________
२) भजन स्पर्धक मंडळाचा पत्ता ____________
३) संपर्क क्रमांक ____________
४) गायकाचे नाव ____________
५) मृदंग वादकाचे नाव ____________
६) तबला वादकाचे नाव ____________

प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट २०२५.

पुरुष खुलागट - महिला खुलागट

प्रथम पारितोषिक ५१,०००/- सन्मानचिन्ह
द्वितीय पारितोषिक २५,०००/- सन्मानचिन्ह
तृतीय पारितोषिक १५,०००/- सन्मानचिन्ह
उत्तेजनार्थ पारितोषिक ७,०००/- सन्मानचिन्ह
उत्कृष्ट पखवाज वादक ७,०००/- सन्मानचिन्ह
उत्कृष्ट तबलावादक ७,०००/- सन्मानचिन्ह

स्पर्धा संपन्न झाल्यानंतर लगेचच स्पर्धेचा निकाल जाहीर करून बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क

सागर राजे - ९२२४३४४१३६, नारायण बुवा पाटील - ७७१५८३५४२४, उमेश बुवा चौधरी - ९३२४८२४२०५,
चंद्रकांत मने - ९७६८६५६४८४, विनोद तोडेकर - ७०४५८२२५४८, जगदीश म्हात्रे ९३२६८१२१९६,
पुनमताई ठाकूर - ७२०८७७६००५, पवन राजे - ९२२१०९७३३७, अभिषेक पटवर्धन - ९०२९५८०३४३,
अनिल कोळी - ९१६७४७४५०७, मच्छिंद्र पाटील - ९००४०४८६३, डॉ. शैलेश वाजेकर - ९८६७२९६८५०

स्पर्धेची नियमावली

१) भजन स्पर्धा प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी अशा दोन टप्यात होईल.
२) प्राथमिक फेरी हि ऑनलाईन स्वरूपात घेण्यात येईल.
३) प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या सर्वोत्तम पुरुष १५ व महिला १५ स्पर्धक भजन मंडळींना अंतिम फेरीसाठी आमंत्रित करण्यात येईल.
४) प्राथमिक फेरीत भाग घेण्यासाठी २ ते ३ मिनिटांचा साउंड सिस्टिम न वापरता शुटींग केलेला नॉन एडिटेड व्हिडीओ 9167474507 या नंबरवर व्हॉट्सअप करावा. सदर व्हिडिओ आणि मंडळाची माहिती (मंडळाचे नाव, सहभागी कलाकारांची नावे इत्यादी, भजन स्पर्धेच्या किमान सात दिवस अगोदर पाठवावी).
५) अंतिम फेरीत निवड झाल्यावर प्रत्यक्ष सादरीकरण करताना मुख्य गायक-वादकांसह कमीत कमी ६ जणांचा आणि जास्तीत जास्त १२ जणांचा समावेश असावा.
६) अंतिम फेरीत भजन सादरीकरणासाठी फक्त २० मिनिटांचा निर्धारित वेळ असणार आहे.
७) श्लोक, भजन, एक अभंग आणि एक गौळण सादर करणे आवश्यक आहे.
८) सादरीकरणासाठी घेतलेले अभंग आणि गौळण हे संताचेच असावेत. (रचलेले अभंग, स्वरचित काव्य, गौळण, भक्तिगीत चालणार नाहीत) अभंग सादरीकरण करताना फिल्मी चालीत अभंग गाऊ नये,
९) निवड झालेल्या मंडळींनी निर्धारित वेळेच्या एक तास अगोदरच उपस्थित राहणे आवश्यक आहे.
१०) व्यासपीठावर बसण्याच्या अगोदरच आपापली वाद्ये सुरात मिळवून ठेवावीत. फक्त आवाज तपासून घेण्यासाठी ५ मिनिटांचा वेळ देण्यात येईल.
११) स्पर्धेसाठी लागणारे साहित्य आणि वाद्ये आपण स्वतःची आणावी.
१२) तबला, पेटी, टाळ, पखवाज हे चार आणि कोरस तीन असे एकूण ७ जण असावेत.
१३) प्राप्त परिस्थितीनुसार कार्यक्रमात फेरबदल करण्याचा आयोजकांना अधिकार राहिल.
१४) परिक्षकांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहिल. परिक्षकांबरोबर कोणत्याही कारणाने वाद घालता येणार नाही.
१५) आवश्यक असल्यास इतर काही नियम कार्यक्रम स्थळी समजविण्यात येतील.
१६) प्राथमिक फेरीत भाग घेतल्यानंतर फोन करुन विचारणा करु नये. अंतिम यादी प्रसारीत करण्यात येईल.
१७) स्पर्धेतील गायक, वादक, चकवा वादक किंवा कोणतेही कोरस दुसऱ्या मंडळात सहभागी होवू शकणार नाही.
१८) पारंपारिक भजनातील साहित्याचा वापर करता येईल. (इलेक्ट्रॉनिक तानपु-याचा वापर करावयास हरकत नाही.)
१९) भजन सादरीकरण करताना पारंपारिक पोषाख असावा.

सुचनाः भजन स्पर्धेत सहभागी झालेल्या मंडळाचे सादरीकरण कसे झाले याबद्दल परिक्षक LIVE समिक्षा करतील. तसेच सहभागी झालेल्या कलाकारांना योग्य त्या प्रतिक्रिया आणि आवश्यक असल्यास सुचना करतील, जेणेकरुन त्यांना प्रोत्साहन मिळेल, शिवाय निकाल देताना पारदर्शकता जपता येईल.


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com